## नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



दैनिक

# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ११७ गुरूवार, दि. १९ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये



साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सिताराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु॥

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु॥ 9765481334


# पाकिस्तानच्या विनंतीवरून युद्धबंदी

## ऑपरेशन सिंदूरबाबत पंतप्रधान मोदी-डोनाल्ड ट्रम्प यांच्यात फोनवर चर्चा

जनता आवाज वृत्तसेवा

**नवी दिल्ली : १४ फेब्रुवारी २०२५ रोजी पंतप्रधान मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हाईट हाऊसमध्ये संयुक्त पत्रकार परिषद घेतली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी फोनवरून चर्चा केली, जी सुमारे ३५ मिनिटे चालली. या संभाषणादरम्यान पंतप्रधान मोदींनी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना ऑपरेशन सिंदूरबद्दल माहिती दिली.**



परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी ही माहिती दिली आहे. ते म्हणाले की, चर्चेदरम्यान पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले की ऑपरेशन सिंदूरशी संबंधित कोणत्याही विषयावर व्यापाराशी संबंधित कोणतीही चर्चा झाली नाही.

त्यांनी पुन्हा सांगितले की भारताने पाकिस्तानच्या विनंतीवरून युद्धबंदी लागू केली आहे. भारताने कधीही कोणत्याही तिसऱ्या पक्षाची मध्यस्थी स्वीकारली नाही आणि भविष्यातही कधीही स्वीकारणार नाही. तसेच, पंतप्रधान मोदींनी यावर भर दिला की आता भारत दहशतवादाच्या घटनांकडे प्रॉक्सी युद्ध म्हणून नव्हे तर थेट युद्ध म्हणून बघेल.

पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यातील बैठक जी-७ च्या पार्श्वभूमीवर होणार होती, परंतु ट्रम्प यांना १७ मे रोजी जी-७ सोडून अमेरिकेत परतावे लागले. यामुळे ही बैठक होऊ शकली नाही. त्यानंतर ट्रम्प यांच्या विनंतीवरून दोन्ही नेत्यांनी फोनवर चर्चा केली. ही चर्चा सुमारे ३५ मिनिटे चालली.

२२ एप्रिल रोजी पहलगाम हल्ल्यानंतर राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींना फोनवरून शोक व्यक्त केला होता आणि दहशतवादाविरुद्ध पाठिंबा दर्शवला होता. त्यानंतर १८ जून रोजी दोन्ही नेत्यांमध्ये ही पहिलीच चर्चा होती. त्यामुळे पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी ऑपरेशन सिंदूरबद्दल सविस्तर चर्चा केली.

मिस्री यांनी असेही सांगितले की, पंतप्रधान मोदींनी ट्रम्प यांना स्पष्टपणे सांगितले की, २२ एप्रिलनंतर भारताने संपूर्ण जगाला दहशतवादाविरुद्ध कारवाई करण्याच्या आपल्या निर्धाराबद्दल सांगितले होते. ६-७ मे च्या रात्री भारताने पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील फक्त दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवरच हल्ला केला होता. भारताच्या कृती अतिशय मोजमापाच्या, अचूक आणि गैर-उत्तेजक होत्या. यासोबतच,

पान ४

### ट्रम्प यांनी युद्धबंदीचा केला दावा

१० मे २०२५ रोजी भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या युद्धबंदीनंतर, ट्रम्प सतत दावा करत आहेत की त्यांच्या मध्यस्थीमुळे युद्ध रोखण्यात आले आहे. त्यांनी आतापर्यंत १३ वेळा हा दावा केला आहे. ते वारंवार म्हणत आहेत की त्यांनी भारत आणि पाकिस्तानमधील संभाव्य युद्ध रोखले. ट्रम्प यांनी दावा केला की जर त्यांनी हस्तक्षेप केला नसता तर ही लढाई अणुयुद्धात बदलू शकली असती.

## संमिश्र

### देशात आतापर्यंत ११३ जणांचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : देशात कोरोनाच्या नवीन प्रकारामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या झपाट्याने वाढत आहे. गेल्या २४ तासांत ४ मृत्यू झाले आहेत. महाराष्ट्रात २ आणि दिल्ली आणि केरळमध्ये प्रत्येकी १ रुग्णाचा मृत्यू झाला आहे. आरोग्य विभागाच्या माहितीनुसार, जानेवारी २०२५ पासून कोरोनामुळे ११३ जणांचा मृत्यू झाला आहे. सर्वाधिक मृत्यू केरळमध्ये ३६ आणि महाराष्ट्रात ३१ आहेत. दिल्लीमध्येही १३ जणांचा मृत्यू झाला आहे.

### चारित्र्यावर संशय घेऊन पत्नीची हत्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पंढरपूर** :पंढरपूर तालुक्यातील टाकळी गावात काल (ता. १८) पहाटे घरगुती वादातून पतीने पत्नीची कोयत्याने वार करून हत्या केली आहे. या हल्ल्यात दोन मुलांसह पतीही जखमी झाला आहे. तिघांवर पंढरपुरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

### शेतकऱ्याने घेतला गेटला गळफास

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बीड** : लेकीच्या लग्नासाठी हक्काचे पैसे मिळत नसल्यामुळे एका तरुण शेतकऱ्याने बँकेच्या गेटला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची भयंकर घटना बीडच्या गेवराई शहरात घडली आहे. सुरेश आत्माराम जाधव असे या शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांनी गेवराई येथील छत्रपती मल्टीस्टेट या खासगी बँकेपुढे आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली.

### साहित्य अकादमीचे पुरस्कार जाहीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : साहित्य अकादमीचे २३ भारतीय भाषांमधील पुरस्कार काल जाहीर झाले. त्यात मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुरेश सावंत आणि तरुण लेखक प्रदीप कोकरे यांना पुरस्कार जाहीर झाला. डॉ. सुरेश सावंत यांच्या आभाळमाया कवितासंग्रहाला बाल वाड्.मय पुरस्कार झालाय. तर प्रदीप कोकरे यांच्या खोल खोल दुष्काळ डोळे कादंबरीला युवावाड्.मय पुरस्कार जाहीर झाला. नांदेडचे डॉक्टर सुरेश सावंत यांनी आजवर ४० पेक्षा अधिक पुस्तके लिहिली आहेत. वाढती बेकारी आणि ग्रामीण भागातून नागर जीवनात येऊन स्थिर होऊ पाहणाऱ्या युवकांचे जग आपल्या कादंबरीमध्ये टिपलेले आहे.




# एसपींचा आदेश अन् सुगंधी तंबाखूवर कारवाई



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पोलिसांचे विशेष पथक तयार करून सदर पथकाला जिल्ह्यांमध्ये अवैध व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या विशेष पथकाने काल संध्याकाळी साडेदहाच्या सुमारास शेवगाव शहरात पेट्रोलिंग करत असताना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, महाराष्ट्र राज्यात तंबाखुजन्य पदार्थाचे विक्री व तयार करण्यास प्रतिबंध असताना खलील नबिब शहा, अल्ताफ पठाण (रा. नाईकवाडी मोहल्ला जामा मशीद, शेवगाव),

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पादुका पूजन

## संत तुकारामांच्या पालखीचे पंढरीच्या दिशेने प्रस्थान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे** : जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखीने आज हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत आषाढी वारीसाठी पंढरीच्या दिशेने प्रस्थान केले. देहू गावापासून निघालेल्या या पालखीत विठ्ठल-रखुमाईच्या भेटीची ओढ असणाऱ्या हजारो वारकऱ्यांचा समावेश आहे.

संत तुकाराम महाराज यांचा यंदाचा हा ३४० वा पालखी प्रस्थान सोहळा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते संत तुकारामांच्या पादुकांचे पूजन झाले. त्यानंतर तुकोबांची पालखीचे पंढरीच्या दिशेने प्रस्थान झाले. पंढरीच्या वारीसाठी मोठ्या संख्येने वारकरी देहू नगरीत दाखल झाले होते. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार सुनेत्रा पवार, खासदार श्रीरंग बारणे,आमदार सुनील शेळके, आमदार विजय शिवतारे, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे,आमदार शंकर म



ांडेकर, विभागीय आयुक्त डॉ चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. जालिंदर मोरे आदी उपस्थित होते.

तत्पूर्वी, येथील मुख्य मंदिराजवळील शिळा मंदिराच्या समोर वारकऱ्यांनी फुगडी खेळण्याचा आनंद लुटला. यावेळी टाळ- मृदुंगाच्या गजरात ज्ञानोबा-तुकोबांचे नामस्मरण केले जात होते. श्री संत तुकाराम महाराज संस्थानने यंदाच्या


पान ४

# पवारांकडून फडणवीसांचे कौतुक

## अजित पवारांवर साधला निशाणा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणूक संदर्भात शरद पवार यांनी मोठे भाष्य केले आहे. लोकांना सोबत घ्यायचा दृष्टीकोन ठेवला असता तर ही परिस्थिती आली नसती, अशा शब्दात त्यांनी अजित पवार यांच्यावर निशाणा साधला आहे. कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर करण्याचा निर्णय घेतल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामाचे कौतुक करत त्यांचे अभिनंदन देखील केले आहे.



या संदर्भात पत्रकारांशी संवाद साधताना शरद पवार म्हणाले की, माळेगाव सहकारी साखर कारखान्याची निवडणूक हा स्थानिक प्रश्न आहे. आजूबाजूला जे तालुके आहेत त्यांचे लक्ष इथे नाही. माळेगाव सहकारी साखर कारखाना माझ्या नावाने ओळखला जातो, ही चांगली गोष्ट आहे. या निवडणुकीत आमची टोकाची भूमिका घ्यायची इच्छा नव्हती आणि आजही नसल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. एक विशिष्ट स्थिती निर्माण झाली होती. लोकांना सोबत

# बँकेत नियमबाह्य नातेवाईक भरती भोवली

## 'सहकार'कडून चौकशी अधिकारी नियुक्त; कलम ८८ ची टांगती तलवार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकेत सन २०२१ ते २०२५ या ४ वर्षात सहकार खात्याची परवानगी नसताना चेअरमन शिवाजी व्यवहारे व मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कोरडे यांनी काही तत्कालीन व विद्यमान संचालकांना हाताशी धरुन नातेवाईकांना बँकेच्या नियमबाह्य सेवेत घेतले व त्या नातेवाईक कर्मचाऱ्यांना बहुमताच्या जोरावर बँकेतून पगार दिला.

यामुळे बँकेचे आर्थिक नुकसान झाले असल्याचा जिल्हा उपनिबंधक यांचा अहवाल आयुक्तांकडे गेल्याने सहकार आयुक्तांनी १९६० चे कलम ८३ (१) अनव्ये पारनेर सहाय्यक उपनिबंधक विकास जाधव यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

चेअरमन व अधिकाऱ्यांनी बँकेत घेतलेले कर्मचारी कामावरून कमी करून त्यांना अदा केलेला पगार कलम ८८ अनव्ये वसूल पात्र होणार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी संजय कोरडे यांना पदावरून हटविण्याचे रिजर्व बँकेचे सैनिक बँकेला स्मरण पत्र दिले आहे.

पत्रात असे म्हटले आहे की, संजय कोरडे हे मुख्य कार्यकारी अधिकारी पदाला पात्र नाहीत. त्यांना पदावरून हटवा, असे संचालक मंडळाला मागील वर्षी संचालक मंडळाच्या मिटींगमध्ये सांगितले होते.

संजय कोरडे यांनीच अनेक संचालकांना बँकेत पदावर बसविल्याने संचालकांनी हतबलता दाखवली.

पान ४

### ...अन् म्हणून कारवाईचा बडगा उगारला

थेट रिजर्व्ह बँकेचे कोरडे यांना हटवून मंडळावर कारवाई करण्याची दाट शक्यता आहे. याबाबत विद्यमान संचालक बाळासाहेब नरसाळे यांनी सांगितले की, चेअरमन व्यवहारे व संजय कोरडे यांनी काही संचालकांना हाताशी धरून अनागोंदी करत आले आहेत व करत आहेत. आता मात्र थेट रिझर्व्ह बँकेनेचं ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची सैनिक बँक वाचावी, म्हणून कारवाईचा बडगा उगारला आहे.

# मदरशात अल्पवयीन मुलाचा शॉक देऊन खून

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हापूर** : मदरसा बंद पडावा आपल्याला गावी जाता यावे म्हणून एका अल्पवयीन मुलाने दुसऱ्या अल्पवयीन मुलाची शॉक देऊन हत्या केली आहे. फैजान नाजिमा असे मृत मुलाचे नाव असून तो बिहारचा रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. कोल्हापूरच्या आळते गावात मदरस्यामध्ये ८० विद्यार्थ्यी शिक्षण घेतात. यातील ७० विद्यार्थी हे बिहारमधील आहेत. हत्या झालेला फैजान नजीमा आणि हत्या करणारा हे दोघेही बिहारचे होते. हत्या करणाऱ्या विद्यार्थ्याला बिहारमधील आपल्या गावी जायचे होते. त्यासाठी ही संस्था बंद पडावी, या उद्देशाने त्याने फैजानची शॉक देऊन हत्या केल्याचे समोर आले आहे. यामुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.

# 'राज' हिंदीच्या सक्तीवर आक्रमक

## सर्वच शाळांच्या मुख्याध्यापकांना लिहिले पत्र

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : आपण हिंदू आहोत हिंदी नाही, अशा शब्दात राज ठाकरे यांनी हिंदीची सक्ती महाराष्ट्रात का? असा प्रश्न उपस्थित केला आहे. मराठी भाषेची शक्ती दक्षिण भारतातील राज्यात कराल का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. आज भाषा सक्ती करत आहात, उद्या इतरही सक्ती होऊ शकते. म्हातारी मेल्याचे दुःख नाही मात्र काळ सोकावला जाईल, असे देखील राज ठाकरे यांनी म्हटले आहे. या संदर्भात राज ठाकरे यांनी सरकारला दिलेली पत्र देखील त्यांनी वाचून दाखवले. तसेच त्यांनी राज्यातील सर्व मुख्याध्यापकांना पत्र लिहिले असून राज्य सरकारला थेट इशारा दिला आहे. या निर्णयामागे आयएएस लॉबी असण्याची शंका त्यांनी उपस्थित केली आहे.

यासंबंधी महाराष्ट्रातील सर्व शाळेच्या मुख्याध्यापकांना राज ठाकरे यांनी पत्र लिहिले आहे. राज ठाकरे यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, हिंदी भाषा सक्तीची करणार नाही, याबाबत आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत

पान ४

### शिक्षणासंबंधीच्या केंद्रीय धोरणात तसा उल्लेख नाही



सर्व भाषा या चांगल्याच असतात. एक भाषा उभी करण्यासाठी कित्येक पिढ्या खर्ची होतात. मात्र लहान लेकरांवर हिंदीची सक्ती लागता येणार नाही, अशा शब्दात राज ठाकरे यांनी राज्य सरकारला खडसावले आहे. केंद्राच्या धोरणात सक्तीचा कोणताच उल्लेख नाही. मग राज्य सरकार असे निर्णय का घेत आहेत? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी केंद्राच्या निर्णयावर देखील बोट ठेवले. शिक्षणासंबंधीच्या धोरणात तसा उल्लेख असल्याचे खोटे सांगितले जात असल्याचेही ते म्हणाले.

# वारकरी सेवा हिच खरी ईश्वरीय सेवा

## बिपीन कोल्हे; कोपरगावात कैकाडी महाराजांच्या दिंडीचे भव्य स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : पांडुरंगाच्या भेटीसाठी मोठ्या भक्तीभावाने पायी दिंडीने निघालेल्या जनसामान्य वारकरी यांना सेवा-सुविधा देण्याचे ईश्वरीय कार्य नारायणशेठ अग्रवाल व त्यांचा परिवार करत असल्याचे मनोगत संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांनी केले.

महान तपस्वी कैकाडी बाबा व हभप कोंडीराम काका यांचा आनंदपुरी ते पंढरपूर मार्गस्त असलेल्या दिंडीचा मुक्काम कोपरगांवात दिंडीचे स्वागताध्यक्ष नारायण अग्रवाल यांचे निवास आणि कृष्णाई बँक्वेट हाती येथे होता.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी आणि मान्यवर म्हणून



संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे, हभप भारत महाराज जाधव, तहसीलदार महेश सावंत, अमृत संजीवनी चेअरमन पराग संधान, पोलीस निरीक्षक रामकृष्ण कुंभार, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक रोठे, मुख्याधिकारी सुहास जगताप, नायब तहसीलदार चंद्रशेखर कुलथे, मंडलाधिकारी मच्छिंद्र पोकळे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. विकास घोलप, डॉ. गायत्री कांडेकर, डॉ. प्रियंका मुळे, डॉ. संकेत मुळे, डॉ. नरेंद्र भट्टड, डॉ. डी. एस. मुळे, डॉ. बापूसाहेब पानगव्हाणे, कैलासचंद ठोळे, भाग्यश्री बडदे, रामू पटेल, माधवराव देशमुख, अरविंद भन्साळी, नारायण अग्रवाल, सुषमा अग्रवाल, विरेश अग्रवाल, पुजा अग्रवाल, सुशांत घोडके, विजया देवकर, विमल पुंडे, मंगेश पाटील, वैभव आढाव, अभिजीत शहा, प्रसाद नाईक, बबलू वाणी, सुधीर डागा, दिलीप कोल्हे, जनार्दन कदम, प्रदीप साखरे, विलास वालझडे, अशोक लकारे, राजेंद्र सालकर, विनोद राक्षे, पप्पू पडियार, योगेश जोबनपुत्रा, विशाल आढाव, राकेश काले, सतीश रानोडे, सुजल चंदनशिव, गोरख देवडे, संजय खरोटे, जितेंद्र गंगवाल, सनी वाघ, दीपकराव विसपुते, संतोष भट्टड, सुनील फंड, आदिनाथ ढाकणे, शैलेश अग्रवाल, किशोर बजाज, विजय बंब, सुधाताई ठोळे, नानासाहेब सिनगर, विशाल अग्रवाल, मनोज अग्रवाल, दिपक अग्रवाल व व्यापारी वर्ग, वारकरी मंडळी आदी नागरिक उपस्थित होते.

दिंडीचे आगमन नारायण अग्रवाल यांचे निवासस्थानी झालेवर तेथे पुजा आरती करुन संतांचे अभंग टाळ मृदुंगाच्या गजरात गायन झाले. ईस्कॉनचे भक्त मंडळ मोठ्या भक्ती भावाने सहभागी झाले होते. प्रमुख अतिथी संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांना मानाची

पान ४

### वारकरी बांधवांची वैद्यकीय तपासणी उपलब्ध

संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या वतीने मोफत फिरता दवाखाना उपलब्ध करून देत दिंडीसाठी निघालेल्या सर्व वारकरी बांधवांची वैद्यकीय तपासणी सुविधा उपलब्ध करुन दिली होती.

# 'अमृतवाहिनी'ला युजीसीकडून 'स्वायत्त दर्जा'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : येथील अमृतवाहिनी औषध निर्माण शास्त्र महा विद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दहा वर्षा करिता म्हणजे २०२५-२०३५ पर्यत 'स्वायत्त संस्था' म्हणून नुकतीच मान्यता बहाल करण्यात आली आहे. या मान्यतेमुळे शैक्षणिक, प्रशासकीय आणि आर्थिक बाबतीत अधिक स्वायत्तता प्राप्त झाली असून अभ्यासक्रम रचना, परीक्षा आयोजन, संशोधन क्षेत्रात नवकल्पनांची अंमलबजावणी अशा विविध स्तरावर निर्णय घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहेत, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. जे. चव्हाण यांनी दिली.



प्राचार्य डॉ. चव्हाण म्हणाले की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात व डॉ. सुधीर तांबे आणि संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त शरयू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी बी फार्मसी महाविद्यालयाने गुणवत्तेमुळे देशात आपला लौकिक वाढवला आहे. महाविद्यालयाच्या गुणवत्ता पूर्ण कामकाजामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने या महाविद्यालयात स्वायत्ततेचा दर्जा दिला आहे.

या स्वायत्त दर्जामुळे महाविद्यालयाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धात्मक ठरणाऱ्या गुणवत्तापूर्ण शिक्षण पद्धती अमलांत

पान ४

# दारू पिण्यास पैसे न दिल्याने आईवर चाकू हल्ला

**आई गंभीर जखमी; पाथर्डी पोलिसांनी आवळल्या मुलाच्या मुसक्या**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** तालुक्यातील भारजवाडी येथे दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याच्या कारणावरून रागाने एका मुलाने आपल्या सख्ख्या आईच्या पोटात चाकूने वार करून गंभीर जखमी केले. ही घटना दि. १४ जून रोजी दुपारी घडली असून या प्रकरणात आरोपी मुलगा अजिनाथ मधुकर ढाकणे (वय ३५) यास सोमवारी अटक करण्यात आली आहे.

या घटनेत रंभाबाई मधुकर ढाकणे (वय ६०, रा. भारजवाडी) अशी गंभीर जखमी झालेल्या आईचे नाव आहे. त्यांच्यावर अहिल्यनगर येथील खाजगी रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत.

घटनेच्या दिवशी रंभाबाई ढाकणे या घरात एकट्याच असताना आरोपी मुलाने दारू पिण्यासाठी पैसे मागितले. पैसे न मिळाल्याने संतापलेल्या अजिनाथने आपल्या पँटच्या खिशातून चाकू काढून थेट आईच्या पोटात वार केला. जोरात ओरडल्याने घराजवळच असलेले नातेवाईक पप्पू बटुळे यांनी धावत येत जखमी महिलेला वाचवले आणि तात्काळ रुग्णालयात दाखल केले.फिर्यादी म्हणून रंभाबाई यांची मुलगी मनिषा ज्ञानदेव बटुळे यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी तत्काळ तपासाची चक्रे फिरवून आरोपीस अटक केली. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक विलास जाधव हे करीत असून पोलिस शिपाई निलेश गुंड हे मदत करत आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून घटनेचा सर्वत्र निषेध होत आहे.

# जि. प. गट व पं. स. गणातून इच्छुकांची भाऊगर्दी

## जामखेडमधील आगामी निवडणुकांसाठी इच्छुक उमेदवारांची जोरदार तयारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड तालुक्यात भाजपाकडून तिन्ही जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणातून इच्छुकांची भाऊगर्दी झाली असून प्रत्येक इच्छुक उमेदवार हे जोरदार तयारी करीत असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

जामखेड तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती असे तीन गट व सहा पंचायत समिती गणाची निवडणूक होणार आहे. ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नाचा निकाल सर्वोच्च न्यायालयात तब्बल तीन वर्षांनी लागला त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक आठ वर्षांनी घेण्याची व्यवस्था निवडणूक आयोगाला करावी लागत आहे. निवडणूक त्यावेळेस लागेल अशा परिस्थितीत सर्वच पक्षातील इच्छुकांनी गेल्या तीन वर्षापासून लोकांशी संपर्क ठेवण्यासाठी आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणात केल्यामुळे त्यांची मोठी दमछाक झाली होती.

परंतु, येत्या सप्टेंबर किंवा ऑक्टोबर महिन्यापर्यंत निवडणूक घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाला दिले असल्याने ग्रामीण भागातील जिल्हा परिषद व पंचायत समिती गणाची निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीकडून उमेदवारी करण्याकरिता इच्छुकांच्या जोरदार हालचालींनी वेग घेतला आहे.

इतर पक्षात सध्या सामसूम दिसत असून काही जण आरक्षण जाहीर झाल्यानंतर भूमिका घेणार असल्याचे सांगत आहेत. परंतु भाजपाकडून सध्या इच्छुकांची संख्या वाढताना दिसत आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी राज्यात कामाच्या माध्यमातून चांगला दबदबा निर्माण केला आहे.

मागील महिन्यात चोंडी येथे मंत्रिमंडळ बैठक व त्यानंतर अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अनेक मंत्री, आमदारांना पाचारण करून कोट्यवधी रुपयांचा निधी जामखेड तालुक्यासाठी मंजूर करून घेतला आहे. केंद्रात व राज्यात भाजपची सत्ता असल्या कारणाने भाजपाच विकास करू शकतो, ही भावना राजकीय कार्यकर्ते व जनतेमध्ये चर्चिली जात आहे. अहिल्यानगर जिल्हा परिषदवर भाजपचा झेंडा फडकविण्यासाठी सभापती शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व महायुतीचे सर्वच आमदार आतापासूनच कामाला लागले आहेत.

### जवळे जि. प. गट व पं. स. गणातून इच्छुक

जवळा जिल्हा परिषद गटातून राजू देशपांडे, बापूराव ढवळे, प्रशांत शिंदे, लहू शिंदे, डॉक्टर गणेश जगताप, अजय सातव हे इच्छुक असून नान्नज पंचायत समिती गणातून मनीषाताई मोहोळकर, प्रशांत शिंदे, पांडुरंग उबाळे, उमेश रोडे तर अरणगाव पंचायत समिती गणातून महादेव ओंबाशे, अंकुश शिंदे, अशोक महारनवर, सुहास वारे, करण ढवळे, राऊत मेजर हे इच्छुक दिसत आहेत.

### खर्डा जि. प. गट व पं. स. गणातून इच्छुक

जामखेड तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी भाजपाकडून अनेक इच्छुक आहेत. यामध्ये खर्डा जिल्हा परिषद गटातून रवींद्र सुरवसे, नंदू गोरे, महेंद्र मोहोळकर, वैजिनाथ पाटील तर खर्डा पंचायत समिती गणासाठी बाजीराव गोपाळघरे, नंदकुमार गोरे, बाळासाहेब गोपाळघरे, महालिंग कोरे, तर नान्नज गणातून सुनील हजारे, महिंद्र मोहोळकर, उदयसिंह पवार हे इच्छुक आहेत.

### साकत जि. प. गट व पं. स. गणातून इच्छुक

साकत जिल्हा परिषद गटातून अजय काशीद, भगवान मुरूमकर, सचिन घुमरे हे इच्छुक असून साकत पंचायत समिती गणातून काकासाहेब गर्जे, महारुद्र महारनवर, मोहिते, भीमराव कापसे, विकास सांगळे, कांतीलाल वराट तर शिऊर पंचायत समिती गणातूनही अनेक इच्छुक ऐनवेळी उमेदवारीसाठी वाढणार आहे.

# पाणी तुंबून पाईपलाईन रोडची कॉलनी जलमय

## पाणी निचऱ्याचा प्रश्न मार्गी लावण्याची आयुक्तांकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहरातील पाईपलाईन रोड, श्रीकृष्ण नगर परिसरातील वैष्णवी कॉलनीत पावसामुळे तुंबलेल्या पाण्याने जलमय होत आहे. या गाळयुक्त व मैलामिश्रित पाण्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, तातडीने पाण्याचा निचरा व्यवस्था सुधारण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



याप्रसंगी माजी नगरसेवक निखील वारे, विजयकुमार कुलकर्णी, प्रकाश कुलकर्णी, रमेश कुलकर्णी, विशाल साबळे, सौ. भंडळकर, दत्तात्रय कुलकर्णी, जीवन क्षीरसागर, कौशल्या लोखंडे आदी नागरिक उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, पूर्वी कॉलनीजवळून वाहणारा ओढा अतिक्रमणामुळे बुजवण्यात आला, त्यामुळे नैसर्गिक निचऱ्याचा मार्ग बंद झाला आहे. त्याऐवजी लहान पाईपमधून पाण्याचा निचरा करण्यात येत असून, मुसळधार पावसात या पाइपांची क्षमताच अपुरी पडते. परिणामी पाण्याचा संपूर्ण प्रवाह थेट कॉलनीत शिरतो व परिसर जलमय होतो.

स्थानिकांनी अनेकवेळा मनपा प्रशासनाकडे तक्रारी केल्या, मात्र आजवर कुठलीही ठोस कार्यवाही न झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे अखेर त्यांनी थेट आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदन दिले. आयुक्त डांगे यांनी याची गंभीर दखल घेत वैष्णवी कॉलनीची पाहणी करून तातडीने उपाययोजना करण्याचे आश्वासन नागरिकांना दिले.

### पाण्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम

वैष्णवी कॉलनीतील नागरिकांना प्रत्येक पावसात घरात साचलेल्या पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. या पाण्यासोबत गाळ, मैला आणि दुर्गंधीयुक्त पाणी घरात शिरत असून, लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत साऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

# ‘विना माती भाजीपाला’ शेतीचा प्रयोग यशस्वी

## प्रवरा कृषी शास्त्र संस्थेत विद्यार्थ्यांच्या प्रयत्नातून हायड्रोपोनिक युनिटचा केला प्रयोग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत असणाऱ्या लोणी येथील कृषी जैवतंत्रज्ञान व कृषि व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयतील विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञान आणि प्रात्यक्षिक यांचा सुरेख संगम साधत मातीविना पिके उगवण्याची ’हायड्रोपोनिक युनिट’ची स्थापना करत या युनिटच्या माध्यमातून पालेभाज्यांची विना मातीची शेतीचा प्रयोग यशस्वी केला आहे.

संस्थेचे अध्यक्ष तथा राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दूरदृष्टीतून प्रेरणा घेत ’शिक्षण हे फक्त पुस्तकी ज्ञाना पुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष जीवनाशी संबंधित असावे म्हणजे विद्यार्थी सैद्धांतिक नव्हे तर व्यवहारिक शिक्षण घेतील’ या उद्देशाने प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून हे युनिट सुरू करण्यात आले.

प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी या युनिटच्या माध्यमातून



केवळ विज्ञानाचेच नव्हे तर व्यवस्थापन, जबाबदारी आणि संघटनेचेही धडे शिकत आहे. हायड्रोपोनिक युनिट मधून सध्या हे विद्यार्थी पालक, मेथी, शेपू, कोथिंबीर, हिरवा माठ, आंबट चुका, करडई इत्यादी भाजीपाला पिकांची लागवड करून नियमित निरीक्षण आणि नोंदी ठेवून उत्कृष्ट कामगिरी बजावत आहे.

हायड्रोपोनिक तंत्रज्ञान ही एक आधुनिक व पर्यावरणपूरक शेती पद्धत आहे, ज्यामध्ये मातीशिवाय वनस्पतींची लागवड केली जाते. या पद्धतीत झाडांना आवश्यक असलेली अन्नद्रव्ये व पाणी थेट मुळांपर्यंत पोचवले जाते. बियाण्यांची उगम प्रक्रिया कोकोपीट किंवा वर्मीकंपोस्ट मध्ये केली जाते. आवश्यकता असल्यास खते पाण्यात मिसळून त्याचे मिश्रण थेट मुळांपर्यंत दिले जाते.

सदर प्रकल्प यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. निलेश दळे, डॉ. आशिष क्षीरसागर, समन्वयक प्रा. सारिका फरगडे, प्रा. स्वरांजली गाढे, डॉ. परिमल विखे, डॉ. महेश जगदाळे, डॉ. अमोल सावंत, डॉ. स्वप्नील नलगे, डॉ. सरिता साबळे व इतर सर्व प्राध्यापक वृंद आदींचे सहकार्य लाभत आहे.

> प्रवरा कृषी शास्त्र महाविद्यालयाचा विद्यार्थी हा केवळ शेतीच्या पुस्तकी ज्ञानातच पुढे न राहता त्याला प्रात्यक्षिकातून प्रत्यक्ष शेतीचा अनुभव यावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून डॉ. सुस्मिता विखे पाटील आणि जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी संलग्नित महाविद्यालयाच्या प्रक्षेत्रावरती वेगवेगळे प्रयोग हे विद्यार्थ्यांच्या माध्यमातून सुरू आहेत. या माध्यमातून सक्षम विद्यार्थी घडवण्याबरोबरच प्रवरेचा विद्यार्थी हा भविष्यात नोकरीबरोबरच शेती आणि शेतीपूरक व्यवसायातूनही पुढे कसा जाईल हाच प्रवरेचा मानस राहिला आहे. यामुळे अनेक प्रकल्पातून विद्यार्थ्यांनी आपली गुणवत्ता ही सिद्ध करत आहे.
>
> **– डॉ. उत्तमराव कदम**

# नागरिकांना विविध योजनांच्या मुख्य प्रवाहात आणणार

## प्रांताधिकारी प्रसाद मते; छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर



> समाधान शिबिराच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजनांचा लाभ वंचितांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. ज्याना लाभ मिळाला नाही, त्यांच्यासाठी कागदपत्रांची पूर्तता करून अडथळे दूर केले जातील. प्रत्येक मंडळात वर्षातून चार वेळा शिबीर घेण्याचे धोरण निश्चित करण्यात आले आहे. अधिकाधिक लाभार्थ्यांना थेट मदत मिळवून देणे, हाच या शिबिराचा मुख्य उद्देश आहे.
>
> **– प्रसाद मते, प्रांताधिकारी**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** शासनाच्या लोकाभिमुख प्रशासनाच्या ध्येयातुन छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर राबवले जात असून, लाभार्थ्यांना थेट योजनांचा लाभ मिळवून देणे, ही या शिबिरामागची प्रमुख भूमिका आहे. प्रक्रियेमधील अडथळे दूर करून अधिकाधिक नागरिकांना योजनांच्या मुख्य प्रवाहात आणणे, हाच आमचा उद्देश आहे, असे प्रतिपादन प्रांताधिकारी प्रसाद मते यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाच्या कार्यक्रम प्रसंगी मते बोलत होते. पाथर्डी तहसील येथे पाथर्डी महसूल मंडळांतर्गत विविध शासकीय योजनांच्या लाभार्थ्यांना लाभाच्या पत्राचे वाटप करण्यात आले.

यावेळी तहसीलदार उद्धव नाईक, नायब तहसीलदार दिग्विजय पाटील, मंडल अधिकारी बाळासाहेब लटके, अनिल बडे, तलाठी संघटनेचे तालुकाध्यक्ष वैभव कराड, प्रदीप मगर, मनोज खेडकर, गणेश वावरे, बाळासाहेब केदार, संध्या शिरसाट, सोनल घोलवड, आकाश डुकरे, अक्षय धोत्रे, सोमनाथ दिनकर, दादासाहेब धाकतोडे, हुमायून आतार, श्रीकांत उदबत्ते आदी उपस्थित होते.

# शब्दगंधतर्फे शनिवारी जलधारा काव्य संमेलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** ‘शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने शनिवार दि. २१ जून २०२५ रोजी दुपारी ४ वाजता कोहिनूर मंगल कार्यालय, पाईपलाईन रोड, सावेडी येथे जलधारा काव्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे अशी माहिती शब्दगंधचे अध्यक्ष राजेंद्र उदागे व संस्थापक सचिव सुनील गोसावी यांनी दिली. यावेळी शब्दगंध चे सभासद यांनी मिळवलेल्या विशेष प्राविण्याबद्दल सत्कार व पत्र लेखन स्पर्धा चे पारितोषिक वितरण करण्यात येणार आहे.

# डॉ. अमरनाथ जगदाळे सेवापूर्ती सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** रा. ब. नारायणराव बोरावके कोलेज श्रीरामपूर येथील उपप्राचार्य विज्ञान विभाग डॉ. अमरनाथ जगदाळे हे प्रदीर्घ सेवेतून ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. या महाविद्यालयात आठ वर्षे सेवा



उत्तम प्रकारे केली आहे. त्यांनी अंधश्रद्धा निवारण कार्य केले आहे. त्यांनी चांगले विद्यार्थी घडविले आहेत. त्यांचा सेवापूर्ती सोहळा नुकताच बोरावके महाविद्यालयाच्या वतीने पार पडला. यावेळी अध्यक्षस्थानी मीनाताई जगधने होत्या.

या समारंभास रयत शिक्षण संस्था व प्रमुख रयत शैक्षणिक संकुल श्रीरामपूर मीनाताई जगधने, माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, डॉ. राजीव शिंदे, प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे, प्राचार्य डॉ. सुहास निंबाळकर, किशोर पाटील, डॉ. निशांत जगदाळे, मैथिली जगदाळे, डॉ. शरद शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्रीरामपुरातील गोंधवणी शाळेत नवागतांचे स्वागत

**माजी आ. कांबळे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपुर :** नगरपालिका शाळा क्रमांक ३ गोंधवणी शाळेच्या पहिल्या दिवशी उत्स्फूर्तपणे विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता गायकवाड यांनी प्रास्ताविक केले.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आ. भाऊसाहेब कांबळे यांच्या हस्ते इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना फुगे व पुष्पगुच्छ देऊन उत्साहात स्वागत करण्यात आले. तसेच इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत सर्व विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप करण्यात आले.



यावेळी माजी आ. कांबळे यांनी विद्यार्थ्यांसाठी वही तसेच शालेय साहित्याचे वाटप करत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कांबळे यांच्या वतीने मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमासाठी माजी आ. भाऊसाहेब कांबळे, शिवसेना तालुका प्रमुख संतोष डहाळे, राजाभाऊ भोसले, सुनिल फुलारे, सरला खंडागळे, संगीता देवकर आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेच्या मुख्याध्यापिका स्मिता गायकवाड, राजेंद्र गायकवाड, प्राची लोळगे, सचिन डोखे यांनी खूप परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र गायकवाड यांनी केले. प्राची लोळगे यांनी आभार मानले.

# मुठेवाडगाव शाळेत नवागतांचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** जिल्हा परिषद शाळेचा दर्जा चांगला असल्यामुळे विद्यार्थ्यांचा कल आता मराठी शाळेकडे वाढला आहे, असे प्रतिपादन भाजपचे तालुका सरचिटणीस डॉ. शंकरराव मुठे यांनी केले.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मुठेवाडगाव येथील पहिलीतील नविन विद्यार्थीचे स्वागत उत्सवासह त्यांना गुलाब पुष्प देवून यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी सर्व विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, वह्या, पुस्तक, बूट, चॉकलेट याचे वितरण शालेय व्यवस्थापन समितीचे तज्ञ डॉ. शंकरराव मुठे, सोसायटीचे संचालक रमेश मुठे, माजी उपसरपंच गणेश गोसावी, प्रगतशील शेतकरी तात्यासाहेब चौधरी, किशोर साठे, योगेश घोडेचोर, रामेश्वर बोरुडे यांच्या हस्ते करण्यात आले.

# भिसेंच्या कल्पकतेतून शहर सौंदर्यकरणात भर पडेल

## आ. संग्राम जगताप; एमएसडी मिरॅकल स्पेस डिझायानर्स दालनाचा शुभारंभ



> एकविरा चौक येथे नवीन ऑफिस स्थलांतरित केले असून या माध्यमातून शहरात चांगल्या वास्तू उभ्या करू. अहिल्यानगर शहराची खेड्याची ओळख पुसली जाणार आहे, बांधकाम क्षेत्रामध्ये सध्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापर करून नवनवीन प्रकल्प उभे केले जाईल.
>
> **– अक्षय भिसे, आर्किटेक**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहर आकार घेत असून इंजिनिअर, आर्किटेक्ट, डिझायनर्सच्या माध्यमातून चांगल्या वास्तू निर्माण निर्माण होत आहे, मागच्या काही वर्षापासून गगनाला भिडणाऱ्या इमारती उभ्या राहत आहे, प्रत्येक व्यक्तीचे एक स्वप्न असते की आपले घर चांगले, सुंदर असावे. आर्किटेक अक्षय भिसे यांनी बांधकाम क्षेत्रामध्ये आपल्या कामाच्या माध्यमातून चांगला ठसा उमटविला आहे त्यांच्या कल्पकतेच्या माध्यमातून शहराच्या सौंदर्यकरणात नक्कीच भर पडेल, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले

एकविरा चौक येथे एम.एस. डी मिरॅकल स्पेस डिझायानर्स या दालनाचा शुभारंभ आ संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी संचालक आर्किटेक अक्षय भिसे, सुरेश चव्हाण, राजेश उत्तेकर, संगीता भिसे, रेश्मा आठरे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.आर्किटेक भिसे म्हणाले की, शहरात गेल्या ५ वर्षापासून एम.एस. डी मिरॅकल डिझायनर्स या दालनाच्या माध्यमातून शहरात चांगले प्रकल्प उभे केले आहे, या माध्यमातून ग्राहकांचा विश्वास देखील संपादन झाला आहे.

# योग, उद्योग, देव या त्रिसुत्रीचा अवलंब करा

## वाडेकर महाराज; नामदेवराव परजणे पुण्यस्मरण सोहळा




**जनता आवाज वृत्तसेवा**

**संवत्सर :** जीवनात निश्चित केलेल्या ध्येयपूर्तीसाठी योग, उद्योग आणि देव या त्रिसुत्रीच्या आधाराने जो वाटचाल करतो तोच यशस्वी होतो. त्यासाठी गुणवत्ता, कार्यक्षमता आणि पात्रता हे गुण माणसाजवळ असायला हवेत, असे उद्गार चाळीसगांव येथील ज्येष्ठ किर्तनकार ह. भ. प. विश्वनाथ महाराज वाडेकर यांनी संवत्सर येथील कार्यक्रमात काढले.

गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघाचे संस्थापक दिवंगत नेते नामदेवराव परजणे पाटील (आण्णा) यांच्या २१ व्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त संवत्सर येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रवचनातून ''योग, उद्योग व देव'' या विषयावर वाडेकर महाराज बोलत होते. ज्येष्ठ किर्तनकार उध्दवजी महाराज मंडलिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सोहळ्यासाठी व्यासपीठावर संवत्सर महानुभाव आश्रमाचे नितीनबाबा महानुभाव, पाथरे आश्रमाचे दामोदर बाबा महानुभाव, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाचे माजी उपाध्यक्ष राजेंद्र जाधव, माजी संचालक प्रमोदबापू पाटील, माजी नगराध्यक्ष मंगेश पाटील, अरुणराव येवले, माजी जिल्हा परिषद सदस्य महेंद्र काले, धनश्री विखे पाटील, मच्छिंद्र टेके यांची प्रमुख उपस्थिती होती.

योग आणि देव या दोन्हींचा संयोग मानवी जीवनाशी निगडीत आहे. शरीराला, मनाला आणि आत्म्याला एकत्र आणणारी ही प्राचीन पध्दत असल्याचे सांगून वाडेकर महाराज यांनी पुढे सांगितले की, योग ही मुळात आध्यात्मिक शिस्त आहे. जी सुक्ष्म विज्ञानावर आधारीत असून प्रत्येक क्रिया ही योगावर चालते. योगाचे व्यापक असे चार वर्गिकरण झालेले आहेत. त्यात कर्मयोग जिथे आपण शरीराचा वापर करतो. भक्तीयोग जिथे आपण भावनांचा वापर करतो. उद्योगाविषयी बोलताना वाडेकर महाराज यांनी माणसाने हातात घेतलेला कोणताही उद्योग हा देव असल्याचे सांगितले. उद्योगासाठी भक्ती नव्हे तर उद्योगातून भक्ती साधता आली पाहिजे.

देव या संकल्पनेविषी वाडेकर महाराज यांनी ईश्वराचे स्वरूप कसे आहे हे कुणीही ठामपणे सांगू शकत नाही. परंतु संपूर्ण विश्वाला संचलित करणारी आणि चराचरात वास करणारी ती एक अदृष्य शक्ती असल्याचे सांगून ज्यावर तुमची नितांत श्रध्दा आहे आणि जो तुमच्या हाकेला धाऊन येतो तो देव, देवाला ओळखण्यासाठी आपण मात्र आपली श्रध्दा लहान बाळासारखी ठेवायला हवी. श्रध्दा आणि ज्ञान एकमेकांच्या विरुध्द नाही. ते एकमेकांना पूरक असलेले आत्मविकासाचे टप्पे आहेत. ते ओलांडल्यानंतर देव, ब्रम्ह, चैतन्य, विश्वरचना याची प्रचिती माणसाला आल्याशिवाय रहात नाही.

# संत निळोबाराय पालखीचे शनिवारी प्रस्थान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** राज्यातील लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेले पारनेर तालुक्यातील पिंपळनेर येथील शेवटचे संत निळोबाराय पालखी सोहळ्याचे शनिवार दि. २१ रोजी दुपारी ३ वाजता श्री क्षेत्र पिंपळनेर ते पंढरपूर प्रस्थान होणार आहे, अशी माहिती श्री संत निळोबाराय देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष अशोकराव सावंत व कार्याध्यक्ष गोपाळ काका मकाशीर यांनी दिली आहे.

संत निळोबाराय समाधीची व पालखीतील पादुकांची शासकीय महापूजा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राकेश आस्थाना व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आणि जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते होईल. तदनंतर ३ ते ४ पर्यंत प्रस्तानाचे हरि किर्तन हभप मोहनानंद महाराज वृंदावडेकर पंढरपूर यांचे होईल. संत निळोबाराय पालखीचे प्रस्थान होत असताना रथाची महापूजा व रथाचा नारळ पद्मभूषण अण्णासाहेब हजारे,

### जिल्हाधिकारी यांच्या हस्ते महापूजा

विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे व जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते नारळ वाढवून होईल. या प्रसंगी जिल्ह्यातील सर्व आमदार खासदार व सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहतील.

जिल्ह्यातील सर्व वारकरी व भाविक भक्त यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, आवाहन संत निळोबाराय संस्थांचे अध्यक्ष अशोकराव सावंत आणि निळोबारायाचे वंशज व पालखी सोहळा प्रमुख गोपाळ काका मकाशीर यांनी केले आहे .

# रूपाली वाघ यांचा खून; गणेश पवार यांचा घातपात

## चौकशी व्हावी : नाशिक-पुणे महामार्गावर रास्ता रोको



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** शेतात शौचाला गेल्याच्या कारणावरून रूपाली वाघ या महिलेचा खून झाल्याची घटना मंगळवारी (दि. १०) जूनला तालुक्याच्या पठार भागातील कर्जुले पठार येथे घडली होती. तसेच तालुक्यातील कोकणगाव येथील गणेश पवार या युवकाचा घातपात झाला आहे. या दोन्ही घटनांच्या संदर्भाने योग्य चौकशी व्हावी, आरोपींवर गुन्हे दाखल व्हावेत, यांसह इतरही मागण्यांसाठी मंगळवारी (दि. १७) संगमनेर बसस्थानकाच्या बाहेर जुन्या नाशिक-पुणे महामार्गावर विविध संघटना, संस्था, राजकीय पक्षांच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकापासून मोर्चाला सुरुवात झाली, हा मोर्चा संगमनेर बसस्थानकासमोर आला असता रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. ज्येष्ठ नेते संतोष रोहोम, एकलव्य संघटना महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष शिवाजी ढवळे, योगेश सूर्यवंशी, रिपाइंचे जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, आशिष शेळके, कैलास कासार, दिलीप बर्डे, राजू खरात, सुनील जाधव, प्रवीण गायकवाड, अब्दुलअजीज व्होरा, संदीप मोकळ, प्रदीप बनसोडे, अनिल बर्डे, रवींद्र गिरी, प्रदीप थोरात, विजय खरात, मंजाबापू साळवे, आकाश गोडगे, आनंद केदार, देवीदास माळी, लक्ष्मण साठे, माणिक यादव, बाळासाहेब गायकवाड, कुंदन माळी, रूपाली सोनवणे, पूनम माळी, मंदा पवार आदी उपस्थित होते.

मयत रूपाली वाघ यांच्यावर पैशाअभावी उपचार न करणाऱ्या शहरातील खासगी रुग्णालय, तेथील डॉक्टर, व्यवस्थापनावर कारवाई व्हावी. गावातील सरपंच, ग्रामसेवक यांनी कामांमध्ये कसूर केली, तसेच पोलिस पाटील व तंटामुक्तीचे अध्यक्ष यांनी गावातील आदिवासी समाजाला गावात राहू न देण्याची भूमिका मांडल्याने त्यांच्यावरही कारवाई व्हावी, आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

# शेवगावात अवैधरित्या कुंटणखान्यावर पोलिसांचा छापा

## १७ पिडित महिलांची सुटका; पोलीस अधिक्षक पथकाची कारवाई




**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शेवगाव शहरात अवैधरित्या सुरू असलेल्या कुंटणखान्यावर पोलिसांचा छापा मारीत १७ पिडित महिलांची सुटका करण्यात आली. या प्रकरणी पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला. यामध्ये एका महिलेचाही सहभाग आहे.

शबाना सैय्यद पठाण, गणेश लक्ष्मण शिंदे असे आरोपींची नावे आहेत. याबाबत अधिक माहिती अशी की, पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी विशेष पथक तयार करुन अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये अवैध धंद्यांविरुद्ध कारवाई करणेबाबत आदेश दिलेले आहेत. वरील नमुद आदेशाप्रमाणे परिविक्षाधीन पोलीस उपअधिक्षक संतोष खाडे हे शेवगाव शहरात विशेष पोलीस पथकासह अवैध धंद्यांची माहिती घेत असताना त्यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, शहरातील शिवाजी नगर या ठिकाणी शबाना सैय्यद पठाण व गणेश लक्ष्मण शिंदे हे कुंटणखाना चालवीत असल्याची माहिती मिळाली.

प्राप्त माहितीनुसार या संतोष खाडे यांचे विशेष पोलीस पथक व पंच आणि महिला पोलीस अंमलदार यांना बोलावुन त्यांना मिळालेल्या माहिती प्रमाणे रवाना केले. शिवाजीनगर या परिसरात पोलीसांचे पथक हे काही अंतरावर जावुन थांबले व त्यांचे पथकातील एका पोलीस अंमलदारास संतोष खाडे यांनी बनावट ग्राहक पाठविले. या ठिकाणी वेशाव्यवसाय सुरू असल्याची खात्री पटताच या ठिकाणी छापा टाकण्यात आला.

सदर ठिकाणी गणेश लक्ष्मण शिंदे (रा. शेवगाव, ता. शेवगाव) मिळुन आला. त्याने सदरचा कुंटणखाना हा शबाना सय्यद पठाण व मी चालवीत असल्याचे सांगीतले. तेथे असलेल्या खोल्यांची पोलीसांनी पंचांसमक्ष पाहणी केली असता दोन खोल्यांमध्ये प्रत्येकी एक पुरुष व एक महिला असे मिळून आले. तिसऱ्या खोलीमध्ये १५ महिला मिळून आल्या. या सर्व महिलांची या पथकाने सुटका केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरोधात पिटा कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पाडळी दर्या घाटातील रस्ता खचल्याने धोकादायक

## भीषण अपघात होऊन जीवित हानी होण्याची शक्यता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पाडळी दर्या च्या घाटात दोन ठिकाणी रस्ता वाहिल्याने वाहतूकीला धोका निर्माण झाला आहे. भीषण अपघात होऊन मोठी जीवित हानी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

घाटाखालील गावांना पठारावरील गावांना जोडणारा पाडळी दर्याचा हा घाट खूप महत्पूर्ण असून या मार्गाने दररोज मोठी वाहतूक होत असते. या मार्गाने एसटी बस, खाजगी दुचाकी, चारचाकी व इतर वाहनांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे चालकांना अतिशय खबरदारी घ्यावी लागते. अन्यथा कोणत्याही क्षणी वाहन व त्यातील प्रवासी खाली दरीत कोसळू शकतात. कित्येक वर्षे या घाटाची डागडुजी वा दुरुस्ती करण्यात आलेली नसून सध्या पडणाऱ्या पावसाने या घाटातील दोन ठिकाणी डांबरी रस्ता खचल्याने मोठे भगदाड पडले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने या पाडळी दर्या घाटाची त्वरीत संपूर्ण दुरुस्ती करून भविष्यातील संभाव्य व भीषण अपघात टाळावा व घाटात ठिकठिकाणी संरक्षक कठडे, दिशादर्शक फलक लावावेत. जेणेकरून भविष्यात होणारा भीषण अपघात टळला जाईल, अशी मागणी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा नगर जिल्हा सचिव सुरेश खोसे पाटील यांनी केले आहे.



# चोरी गेला लाखोंचा माल, दाखवला हजारांचा

## गुहातील चोरीबाबत फिर्यादीने दिली माध्यमांना माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** नगर- मनमाड रस्त्याचे काम करण्यासाठी आलेल्या राहुरी तालुक्यातील गुहा येथील मनिषा कन्ट्रक्शन या कंपनीचा लाखो रुपयांचा माल लंपास करून चोरी गेलेले असताना राहुरी पोलिसांनी केवळ हजारो रुपयांचा मुद्देमाल चोरी गेल्याची फिर्याद दाखल केली असल्याचे मनीषा कन्स्ट्रक्शनचे सुपरवायझर तथा फिर्यादी घनश्याम गुहर प्रजापती यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले आहे.

गुहा परिसरात तांभेरे रोडवर पनिगा कन्स्ट्रक्शन या कंपनीचे आफिस असून तेथे मशिनरी ठेवलेल्या आहेत. घनश्याम गुहर प्रजापती, हे त्या ठिकाणी सुपरवायझर म्हणून काम पाहतात. दि. १४ जून २०२५ रोज सुपरवायझर घनश्याम व वॉचमन भारत हे दोघे ऑफिस जवळ गप्पा मारत बसले होतो. त्यावेळी ऑफिस पासून काही अंतरावर दोन इसम एक टेम्पो घेऊन चालले होते. तेव्हा धनश्याम वॉचमन भारत यांनी सटर टेम्पोला थांबवून पाहिले असता टेम्पोमध्ये मनिषा कन्स्ट्रक्शन या कंपनीच्या बंद ट्रान्सफार्मरच्या कापलेल्या तसेच दुसऱ्या कंपनीच्या ऑफिस मधील रही व लोखंड टेम्पोमध्ये दिसून आले. आरोपींना या बाबत विचारले असता त्यांनी उडवा उडवीत्री उत्तरे देऊन शिविगाळ दमदाटी केली. यावेळी ६३ हजार रुपयांच्या मुद्देमालासह एमएच ४२ एक्यू १०९५ नंबर असलेला टेम्पो व दोघांना सुरक्षा रक्षकांना ताब्यात घेऊन पोलिसांना कळविले.

केबलपती यांच्या फिर्यादीवरून सत्यजित राजेंद्र काचोळे व विश्वजित राजेंद्र काचोळे, दोघे रा. खडांबे बुद्रक, ता. राहुरी, या दोघांवर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, पोलिसांनी चोरी गेलेल्या मालाची किंमत दाखविल्याचा आरोप केबलपती यांनी केला आहे.

# सामाजिक उपक्रमांनी ना. विखेंचा वाढदिवस साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** सामाजिक कार्याचा वसा घेत सामाजिक, राजकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या जलसंपदा मंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचा वाढदिवस लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अळकुटी महाविद्यालयात सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिराबरोबरच महाविद्यालयाच्यावतीने स्वछता शिबीर, वृक्षारोपण करत व वृक्ष संवर्धनाचा संदेश देत साजरा करण्यात आला.



यावेळी डॉ. सुस्मिता विखे पाटील म्हणाल्या की, ना. विखे यांनी सामाजिक कार्याचा वसा कायमच जपला आहे. या माध्यमातून त्यांनी वेगवेगळे उपक्रम राबवत असताना राजकारण नव्हे तर समाजकारणासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांचा वाढदिवस हा सामाजिक उपक्रमातून साजरा व्हावा. हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून संस्थेच्या माध्यमातून भव्य रक्तदान शिबिर, वृक्ष संवर्धन ही काळाची गरज आहे

संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून प्रवरेच्या सर्वच शाळा महाविद्यालया मध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. आपला वाढदिवस हा कोणत्याही प्रकारचे जाहीर कार्यक्रम करण्याऐवजी सत्काराला फाटा देत सामाजिक उपक्रम म्हणून साजरा करावा, असे आवाहन नामदार डॉ. विखे पाटील यांनी केले होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील अळकुटी आणि आजूबाजूच्या खेडोपाडी असणारे विद्यार्थी हे शिक्षणाच्या माध्यमातून विकासाच्या मुख्य प्रवाहात यावेत , हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी अळकुटी येथे उच्च महाविद्यालयीन शैक्षणिक सुविधा निर्माण केली आहे.

# दराअभावी दुग्ध व्यवसाय आला मोडकळीस

## पशुखाद्याच्या दरात वाढ; दर केवळ ३४ रुपये

सध्याच्या परिस्थितीत हिरवा चारा व पशुखाद्याच्या वाढत्या दराचा आणि घसरत्या दूध दराचा विचार केला तर दूध उत्पादक शेतकऱ्यांना आपले आर्थिक गणित जुळवणे अवघड झाले आहे. सध्या खाद्याचे भाव सरकी पेंड १९५० रुपये, कांडी १५८० रुपये, वालीस १३०० रुपये, मका भरडा १३०० रुपये, हिरवा चारा ऊस एका टनाचे ३६०० रुपये, हिरवी मका २००० रुपये टन असा भाव असल्याने शेतकऱ्यांच्या हातात काहीच राहत नाही.

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** ग्रामीण भागातील शेती व्यवसायाशी पूरक असलेला दुग्ध व्यवसायदुधाला भाव नसल्याने अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडून पडले आहे. दूध भेसळीबरोबरच पशुखाद्यातही मोठ्या प्रमाणात भेसळ होताना दिसत आहे. त्यामुळे शासनाने पशुखाद्य व दुधाच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणारी प्रभावी यंत्रणा उभी करून कडक कारवाई करण्याची तसेच दुधाला हभीभाव देण्याची मागणी दूध उत्पादक शेतकऱ्यांकडून होत आहे.

ग्रामीण भागामध्ये शेतीला पूरक असा जोडधंदा म्हणून खात्रीशीर दुग्ध व्यवसाय असल्याने तरुणवर्ग दुग्ध व्यवसायाकडे वळला आहे. अनेक तरुण दूध उत्पादक शेतकऱ्यांनी बँकाचे लाखो रुपयांचे कर्ज घेऊन दुग्ध व्यवसाय सुरू केला आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांना मोठी हालअपेष्टा सहन करून आपल्या शेतातून भर पावसात चिखलमय रस्त्यातून जनावरांसाठी चारा आणावा लागत आहे. सध्या ३.५ फॅट व ८.५ एसएनएफला ३३ ते ३४ रुपयांचा दर मिळत आहे. त्यामुळे दूध उत्पादक



शेतकरी मेटाकुटीस आले आहेत. त्यासाठी शासनाने ३.५ फॅट व ८.५ एसएनएफला ४५ ते ५० रुपये दर ठरवावा, अशी मागणी दूध उत्पादक शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे.

प्रामाणिक दूध उत्पादकाच्या दुधाला कवडीमोल दर मिळत आहे. दुधाचे दर वाढण्यास सुरुवात झाली की, लगेचच दुधाचे दर पुन्हा कमी होण्यास सुरुवात होते. त्यासाठी शासनाचे खासगी दूध संघावरही नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. याबाबत शासनाने दुधाचे दर ठरविण्यासाठी राज्य दूध दर नियंत्रण समितीची स्थापना केली होती, मात्र त्याचा काहीच उपयोग झाला नाही. शासनाने द्धाला उसाप्रमाणे दुधाची ही एफआरपी ठरवून हमीभाव देणे अत्यंत गरजेचे आहे. शेतकऱ्यांना पदरमोड करून आपल्याकडील पशुधन सांभाळण्याची दुर्दैवी वेळ आली आहे.

## संपादकीय

# युध्द चिंता वाढवतेय...

इराण-इस्रायल युद्धाची स्थिती बिकट होत चालली आहे. दोन्ही बाजूंनी क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले होत आहेत. आतापर्यंत हे युद्ध फक्त इराण आणि इस्रायलमध्येच मर्यादित असल्याचे दिसून येत आहे. मात्र अमेरिका आणि रशिया-चीन या युद्धात थेट सहभागी झाले तर जगावर गंभीर परिणाम होऊ शकतो. वरकरणी हे युध्द थांबवण्याचे अनेक प्रयत्न होत असले तरी संघर्ष वाढून जागतिक शांततेला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. इराण आणि इस्रायलमधील युद्धात आता अमेरिका उतरण्याची शक्यता आहे. मध्य पूर्वेत अमेरिकेचे चार हजार सैनिक तैनात आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला अल्टिमेटम दिला आहे. इस्रायलने इराणवर केलेल्या हल्ल्यांमध्ये इराणचे मोठे नुकसान झाले. इराणचे अनेक महत्त्वाचे अधिकारी आणि टॉप कमांडर मारले गेले. त्यामुळेच इराणकडून युद्धविरामाचे संकेत देण्यात आले. अमेरिकेने इराण आणि इस्रायलमधील युद्धात उडी घेतल्याचे परिणाम अत्यंत विनाशकारी असू शकतात. ट्रम्प यांनी वारंवार नाकारले असले तरी वास्तवात अमेरिकेने इस्रायलच्या हल्ल्यांना पाठिंबा दिला, असा आरोप इराणने केला. दुसरीकडे, अमेरिकेची मोठी सुसज्ज युध्दनौका इस्त्रायलच्या मदतीला आल्याचे सांगितले जाते. त्याच वेळी युद्धादरम्यान इराण मध्य पूर्वेतील अमेरिकन तळांवर हल्ला करू शकतो, अशी भीती व्यक्त करण्यात आली. इराकमधील विशेष दलांच्या छावण्या, आखातातील लष्करी तळ आणि या प्रदेशातील राजनैतिक मोहिमांकडे इराणचे लक्ष्य आहे. इराकमधील अमेरिकेच्या तळावर हल्ला करून इराणने अमेरिकेला ललकारले. अमेरिकेला असा हल्ला होण्याची भीती होती, म्हणून त्यांनी आपल्या काही कर्मचाऱ्यांना परत बोलावले. यासोबतच अमेरिकन तळांवर झालेल्या कोणत्याही हल्ल्यानंतर इराणला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागू शकते असा कडक इशारा देण्यात आला. अशा परिस्थितीमध्ये तेल अवीवमध्ये किंवा इतरत्र एखादा अमेरिकन नागरिक मारला गेल्यास काय होईल? ट्रम्प यांच्यासारखा हुकूमशाही वृत्तीचा अध्यक्ष ते मूकपणे पाहणार नाही. नेतान्याहू यांच्यावर बराच काळापासून इराणला पराभूत करण्यासाठी अमेरिकेला बरोबर घेतल्याचा आरोप आहे. अमेरिकेकडे बंकर फोडणारे बॉम्ब आहेत, जे इराणी अण्वस्त्र असलेल्या भागामध्ये, विशेषतः फोर्डोमध्ये सर्वात खोलवर प्रवेश करू शकतात. दरम्यान, अमेरिकेने आपल्या नागरिकांना सतर्क केले आणि विनाकारण इराणला प्रवास करू नका, तेहरान त्वरीत सोडा असे सांगितले. इराणमध्ये असणाऱ्या अमेरिकन नागरिकांनी ताबडतोब देश सोडावा आणि तसे करु न शकणाऱ्यांनी बराच काळ तेथे राहण्यास तयार रहावे, असे अमेरिकेने म्हटले. अमेरिकेच्या विधानातून असेही सूचित होते की हे युद्ध दीर्घकाळ टिकू शकते. त्याचा परिणाम संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. कारण इराण हा तेल आणि वायूचा मोठा उत्पादक आहे. इराणच्या हमास आणि हिजबुल्लाहसारख्या 'प्रॉक्सी फोर्सेस' बऱ्याच प्रमाणात कमकुवत झाल्या आहेत; परंतु त्यांच्या समर्थक असलेला इराकमधील मिलिशिया अजूनही शस्त्रसज्ज आणि एकजुटीमध्ये आहेत. इराणकडे ४०० किलोग्रॅमपर्यंत समृद्ध युरेनियम असल्याचा अंदाज आहे. ते दहा किंवा त्याहून अधिक अणुबॉम्ब बनवण्यासाठी पुरेसे आहे आणि इराण शस्त्रास्त्र दर्जाचे युरेनियम तयार करण्याच्या अगदी जवळ आहे. ते गुप्त खाणींमध्ये खोलवर लपवले असल्याचे मानले जाते. इस्रायलने काही अणुशास्त्रज्ञांना मारले असले, तरी कोणताही बॉम्ब इराणचे ज्ञान आणि कौशल्य नष्ट करू शकत नाही. इस्रायल आणि इराणमधील संघर्षानंतर कच्च्या तेलाच्या किमती वाढू लागल्या आहेत. इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याचा प्रयत्न केल्यास तेल आयात आणि निर्यातीत नवा अडथळा निर्माण होईल. जगभरातील अनेक देश आज महागाईशी झुंजत आहेत. तेलाच्या किमती वाढल्याने जागतिक अर्थव्यवस्थेत महागाई वाढेल. जागतिक अर्थव्यवस्था आधीच ट्रम्प यांच्या टॅरिफवाढीच्या ओझ्याखाली आहे.

वाढत्या तेलाच्या किंमतींमुळे रशियाचा सर्वाधिक फायदा होणार आहे. त्याच्याकडे युक्रेनविरुद्धच्या युद्धासाठी अचानक अब्जावधी डॉलर्स येतील. नेतान्याहू दावा करतात की, इराणची अणु क्षमता नष्ट करणे हे त्यांचे प्राथमिक ध्येय आहे; परंतु त्यांनी अलिकडेच स्पष्ट केले की त्यांचे व्यापक ध्येय इराणमधील राजवट बदलणे हे आहे. इराणचे सरकार उलथवून टाकण्याची कल्पना इस्रायलींना आवडू शकते; पण त्यामुळे निर्माण होणाऱ्या पोकळीचे काय? त्याचे अनिश्चित परिणाम काय असतील? इराणमध्ये गृहयुद्धाची परिस्थिती निर्माण झाल्याचे परिणाम काय असतील? इराक आणि लिबियामध्ये मजबूत केंद्रीकृत सरकारे काढून टाकली गेली तेव्हा काय घडले, हे अनेकांना आठवत असेल. भविष्यात हा संघर्ष कसा घडेल, यावर बरेच काही अवलंबून आहे. इराण आणि इस्त्राईलमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला मोठा संघर्ष आधीच अस्थिर असलेल्या पश्चिम आशियालाच अस्थिर करणार नाही, तर नाजूक जागतिक भू-राजकीय आणि आर्थिक परिस्थितीदेखील उलथून टाकू शकतो. दोन देशांमधील हा संघर्ष आता त्यांच्यापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर त्यात अवघे जग ओढले जात असल्याने जगाची तिसऱ्या महायुद्धाकडे वाटचाल सुरू होते की काय, अशी भीती व्यक्त केली जात आहे. इराण आणि इस्त्रायलच्या हल्ला-प्रतिहल्ल्यात दोन्ही देशांच्या संरक्षण व्यवस्थांचे नुकसान तर झालेच; शिवाय आता त्यात सामान्य नागरिकही बळी जायला लागले आहेत. इस्त्रायलने केलेल्या गेल्या काही दिवसांमधील हल्ल्यांमध् इराणच्या अणुभट्ट्या उद्ध्वस्त झाल्या. लष्करी अधिकारी मारले गेले. अणुशास्त्रज्ञ ठार झाले, तर इराणने केलेल्या प्रतिहल्ल्यात इस्त्रायलचे आयर्न डोम संरक्षणात अपयशी ठरल्याचे चित्र पुढे आले. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनी यांनी इस्त्रायलवर सूड उगवण्याचा इशारा दिला, तर इस्त्रायलनेही इराणला हल्ले न थांबवल्यास बेचिराख करण्याचा इशारा दिला. आता इराण इस्रायलच्या अणुसंवर्धन सुविधा आणि पर्शियन आखातातील अमेरिकेच्या तळांना लक्ष्य करू शकतो. हल्ल्याच्या काही तासांनंतर इस्रायलने इराणवर शंभर ड्रोन डागल्याचा दावा केला. याचा अर्थ पश्चिम आशिया पुन्हा एकदा संभाव्य विनाशकारी युद्धाच्या उंबरठ्यावर आहे. त्याचे गंभीर प्रादेशिक आणि जागतिक परिणाम होतील.

# हिमनद्यांच्या अस्तित्त्वालाच धोका

**पर्यावरण**

**– मिलद बेंडाळे,**
**पर्यावरण अभ्यासक**



नेपाळमधील पर्यायाने आशियातील पहिली हिम नदी मृत झाली आहे. हिंदू कुश हिमालयाच्या ३,५०० किलोमीटर लांबीच्या पर्वतरांगांमध्ये असलेल्या हिमनदीचे गेल्या दहा वर्षांपासून सतत निरीक्षण केले जात आहे. हिमालयातील ग्लेशियर (क्रायोस्फिअर) वेगाने वितळत असून हिमनद्यांचे अस्तित्त्व धोक्यात आले आहे. सरकार तसेच प्रशासनाच्या पातळीवर या घटनेची गांभिर्याने नोंद घेतली जायला हवी.

जगभरात हिमनद्यांच्या अस्तित्त्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. हिमालयाचा क्रायोस्फिअर किती वेगाने वितळत आहे याचा हा पुरावा आहे. क्रायोस्फिअर हा पृथ्वीच्या प्रणालीचा घटक आहे. त्यात हिमनद्या, बर्फाचे थर आणि गोठलेले पाणी यांचा समावेश होतो. १९७५ पासून जगभरातील पर्वतीय हिमनद्यांमधून सुमारे नऊ ट्रिलियन टन बर्फ गायब झाला आहे. शास्त्रज्ञांच्या मते ही गती अशीच सुरू राहिली तर २१ व्या शतकाच्या अखेरीस बहुतेक हिमनद्या इतिहास बनू शकतात. हिम नद्या नष्ट होणे हे केवळ बर्फाचे नुकसान नाही, तर येणाऱ्या पिढ्यांसाठी पाण्याचे संकट आणि विनाशकारी पुराचा इशारा आहे. अफगाणिस्तान, बांगलादेश, भूतान, चीन, भारत, म्यानमार, नेपाळ आणि पाकिस्तान या आठ देशांमध्ये ३,५०० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे हिंदूकुश हिमालयीन पर्वत दहा प्रमुख नदी खोऱ्यांना पाणी पुरवतात. त्यावर २४० दशलक्ष लोक अवलंबून आहेत. सुमारे १.६५ अब्जाहून अधिक लोक पिण्यासाठी आणि स्वच्छता, शेती, जलविद्युत आणि परिसंस्थेच्या सेवांसाठी त्यांच्या पाण्यावर अवलंबून आहेत. हवामान बदलामुळे वाढत्या उष्णतेमुळे हिमनद्यांचे मोठे नुकसान झाले आहे. याचा परिणाम संपूर्ण परिसंस्थेवर होत आहे. हिमनद्या जलद गायब होण्याची प्रक्रिया हिमालयीन परिसंस्था, हवामान संतुलन आणि मानवी जीवनासाठी धोका आहे. हिमनदीसारखी उदाहरणे आपल्याला इशारा देत आहेत की, आपण त्वरित आणि ठोस पावले उचलली नाहीत, तर येत्या काही दशकांमध्ये आपल्याला पाणी संकट, भूस्खलन आणि विनाशकारी पुरांना सामोरे जावे लागेल.

'लँडसॅट ॲनालिसिस रेडी डेटा'मधून मिळवलेल्या 'हिंदू कुश हिमालयीन प्रदेशात २००१ ते २०२१ पर्यंत बारमाही बर्फ आणि बर्फाचे आवरण बदल' या संशोधन पत्रात म्हटले आहे की २००१ ते २०२१ दरम्यान हिमालयीन प्रदेशात बर्फवृष्टी १३ टक्क्यांनी कमी झाली आहे. या काळात दर वर्षी सरासरी ७५१ चौरस किलोमीटर हिमवर्षाव कमी झाला आहे, जो हवामानबदलाच्या परिणामांचे प्रतिबिंब आहे. अलीकडेच शास्त्रज्ञांना आढळून आले की जून २०२४ पर्यंत सुत्री ढाका हिमनदीतील बर्फाची जाडी ५० टक्क्यांपेक्षा कमी झाली आहे. त्याच वेळी उपग्रह डेटाच्या विश्लेषणातून दिसून आले आहे की माउंट एव्हरेस्टच्या वरच्या भागात बर्फ १५० मीटरने कमी झाला आहे. संशोधकांच्या मते आता बर्फ केवळ वितळत नाही, तर त्याचे थेट बाष्पीभवन होत आहे. त्यामुळे दररोज सुमारे २.५ मिलीमीटर बर्फाचे नुकसान होत आहे. हे हवामानबदलाच्या वाढत्या परिणामाचे थेट संकेत आहेत. थेट बाष्पीभवन प्रक्रियेवरून स्पष्टपणे दिसून येते की तापमान वाढत आहे. हवेतील आर्द्रता कमी होत आहे आणि सूर्याची किरणे थेट हिम नदीवर पडत आहेत. हिमनद्यांसाठी हे खूप धोकादायक आहे. कारण या प्रक्रियेमुळे बर्फ वेगाने वितळून जातो. त्यामुळे पाणी साचू शकत नाही. अमेरिकेतील निकोल्स कॉलेजमधील पर्यावरण विज्ञानाचे प्राध्यापक आणि हिमनद्यांचा अभ्यास करणारे हिमनदीशास्त्रज्ञ मौरी पेल्टो यांनी आपल्या अभ्यासात म्हटले आहे की ऑक्टोबर २०२३ ते जानेवारी २०२५ च्या सुरुवातीपर्यंत 'नासा'च्या उपग्रहांकडून मिळालेल्या प्रतिमांचे विश्लेषण केल्यानंतर २०२४ आणि २०२५ मध्ये माउंट एव्हरेस्टवर बर्फ वेगाने कमी होत असल्याचे दिसून आले आहे. जगातील सर्वात उंच पर्वत शिखर असलेल्या माउंट एव्हरेस्टवरील बर्फ कमी झाल्यामुळे हवामान धोकादायक पातळीवर गरम होत असल्याचे दिसून येते.

संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमात प्रकाशित झालेल्या अहवालात म्हटले आहे की हिमालयासारख्या भागात वाढत्या तापमानाची समस्या तिप्पट आहे. त्यामुळे पर्वतीय हिमनदी वितळतात. परिणामी पूर येऊ शकतो. यामुळे हिमनदींची व्याप्ती कमी होते. त्यामुळे शेती आणि जलविद्युत यांच्यासाठी पाण्याची दीर्घकालीन उपलब्धता कमी होते. तज्ज्ञांचा विश्वास आहे की हिम नद्या वितळल्याने सुरुवातीला नद्यांमध्ये पाणी वाढू शकते; परंतु हळूहळू हिम नद्या संपल्यानंतर या नद्यांची पाण्याची पातळी कमी होऊ लागेल. त्यामुळे भविष्यात गंभीर जलसंकट निर्माण होऊ शकते. हिमनद्या वितळल्याने तयार झालेल्या तलावांमध्ये जास्त पाणी साचत आहे. त्यामुळे हिमनद्या फुटण्याच्या घटनांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. याचा खालच्या प्रवाहातील जलसंपत्ती, समुद्रपातळी आणि भारतातील अनेक बारमाही नद्यांवर गंभीर परिणाम होईल. जंगलातील आगी आणि पर्वतांवर वाहनांच्या वाढत्या संख्येमुळे निर्माण होणारे काळे कार्बन कण हिमनद्यांच्या पृष्ठभागावर जमा होतात आणि सूर्यकिरण शोषून घेतात. त्यामुळे बर्फ वितळण्याचा वेग अधिक प्रमाणात वाढतो. हे काळे कण आता हिमालयातील हिमनद्यांचे अदृश्य शत्रू बनले आहेत. वाऱ्यासह हा काळा कार्बन हिमनदीपर्यंत पोहोचत आहे. पर्वतांवर वाहनांची वाढती संख्या काळ्या कार्बन उत्सर्जनाचे एक प्रमुख कारण आहे. काळा कार्बन हा पीएम २.५ चा एक प्रमुख घटक आहे. तो एक सूक्ष्म कण आहे. त्याच्या उत्सर्जनाचे आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. २०२१ मध्ये काळ्या कार्बनमुळे होणारे वायूप्रदूषण ८ दशलक्षाहून अधिक अकाली मृत्यूंसाठी जबाबदार आहे. काळ्या कार्बन आणि धुळीसारख्या एरोसोलमुळे हिमालयाच्या पायथ्याशी मुसळधार पावसाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे भारताचा गंगेचा मैदानी प्रदेश जगातील सर्वात प्रदूषित क्षेत्रांपैकी एक बनतो.

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, राउरकेला, लाइपझिग इन्स्टिट्यूट फॉर मटेरॉलॉजी, लाइपझिग विद्यापीठ, 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, मद्रास, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, कानपूर येथील संशोधकांच्या पथकाने केलेल्या अभ्यासात वर नमूद केलेले अनेक धोके समोर आले आहेत. या संशोधकांनी दाखवून दिले की कण उत्सर्जनामुळे ढग प्रणालींचे भौतिक गुणधर्म बदलू शकतात. परिणामी, प्रदूषित शहरी भागात पावसाच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. हिमाचल आणि नुब्रा खोऱ्यांमध्ये हिमवर्षाव कमी होत आहे. 'इस्रो' आणि 'हिमकोस्ट'च्या अहवालात म्हटले आहे की हिमाचल प्रदेश आणि नुब्रासारख्या खोऱ्यांमध्ये दर दशकात सरासरी दोन मिलीमीटर हिमवर्षाव कमी झाला आहे. त्याच वेळी पावसाच्या प्रमाणात वाढ झाल्याने हवामान असंतुलन आणखी वाढले आहे. ही खोरी काराकोरम आणि ग्रेट हिमालयीन पर्वतरांगांमध्ये येतात. हवामानबदलामुळे दोन्ही खोऱ्यांमध्ये बर्फवृष्टी कमी झाली आहे; परंतु पाऊस वाढला आहे. गेल्या तीन दशकांमध्ये डिसेंबर महिन्यात बरेच चढउतार दिसून आले आहेत. 'डीआरडीओ'चे शास्त्रज्ञ एम. आर. भुतियानी यांनी एका संशोधनात भाकित केले आहे की, पुढील १२० वर्षांमध्ये वायव्य हिमालयातील कमाल तापमान तीन अंशांनी वाढू शकते. तापमानात झालेल्या या वाढीमुळे पर्वतांच्या हवामानात बदल होईल. अशा परिस्थितीत येणाऱ्या काळात बर्फवृष्टीत आणखी घट दिसून येऊ शकते.

'चायनीज ॲकेडमी ऑफ सायन्स अँड कॉलेज ऑफ अर्थ अँड एन्व्हायर्नमेंटल सायन्स'च्या संशोधकांना संशोधनात आढळून आले की सामान्यतः हिमनदीतील बर्फावर सूर्यप्रकाश पडतो, तेव्हा तो शंभर टक्के परावर्तीत होतो; परंतु बर्फावर जमा होणारे प्लास्टिकचे छोटे कण सूर्यप्रकाश शोषून घेतात. यामुळे तापमान वाढते आणि हिमनदी वितळू लागते. वाऱ्यासह हिमनदीपर्यंत पोहोचणारे हे प्लास्टिकचे छोटे कण आकाराने पाच मिलिमीटरपेक्षा लहान असतात. चीनी संशोधकांना आर्क्टिक, आल्प्स, तिबेट, अँडीज आणि अंटार्क्टिकामध्ये मायक्रोप्लास्टीक कण आढळले आहेत. शास्त्रज्ञांच्या मते मायक्रोप्लास्टीकचा परिणाम जाणून घेण्यासाठी अजूनही सखोल संशोधन आवश्यक आहे. या बदलांचा जलसंपत्ती आणि जलचक्रावर मोठ्या प्रमाणात परिणाम झाला आहे. २१ व्या शतकात तिबेटी पठारावर साठलेल्या हिमनद्या २१ टक्क्यांपर्यंत वितळतील, अशी अपेक्षा आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात हिमनद्यांमधून येथून निघणाऱ्या नद्यांमध्ये येणाऱ्या पाण्याचे प्रमाण २८ टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकते. एका अभ्यासानुसार १९६० ते २००० दरम्यान तिबेटमधील नाम को सरोवराजवळील हिमनदीच्या जलद वितळण्यात मायक्रोप्लास्टिक्सचा वाटा आठ टक्के होता. लहान प्लास्टिक कणांमुळे येथील तापमान अडीच अंशांनी वाढले. मायक्रोप्लास्टिक्स व्यतिरिक्त काळ्या कार्बनमुळे हिमनद्या वेगाने वितळत आहेत. आर्क्टिकच्या काही भागात काळ्या कार्बनमुळे जुलै ते सप्टेंबर दरम्यान बर्फ वितळण्याचा दर एक ते तीन टक्क्यांनी वाढला. यावरून हिमनद्या नष्ट करण्यास हवामानबदल आणि मानव कसा जबाबदार आहे, हे लक्षात येते. या घडामोडींची गांभिर्याने नोंद घेणे आवश्यक आहे.

# अपघात निधीचा नियमबाह्य वापर व्याजासह भरा

## प्रवासी महासंघाचे अध्यक्ष रणजीत श्रीगोड यांची परिवहन मंत्री यांच्याकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : एसटी खात्याने अपघात सहाय्यता निधी योजनेतील कोट्यावधी रुपयांचा निधी नियमबाह्य वापरात असल्याने तो व्याजासहित त्वरित भरावा, अशी मागणी प्रदेश प्रवासी महासंघाचे अध्यक्ष रणजीत श्रीगोड यांनी परिवहन मंत्री यांच्याकडे केली आहे.

सन २०१६ मध्ये बसचे प्रवासात अपघात होऊन प्रवाशांचा मृत्यू झाल्यास त्यांचे वारसदाराला दहा लाख रुपये देण्यासाठी अपघात सहायता योजनेची स्थापना करून धर्मदाय आयुक्त यांच्याकडे ट्रस्ट स्थापन करण्यात आले. प्रवासी हा प्रवास करताना एक रुपया विशेष निधी प्रत्येक तिकिटामागे आकारणी करण्यात येत आहे.

दररोज लाखो रुपयांचा प्रवाशांचा निधी एसटीकडे जमा होतो. हा स्वतंत्र ट्रस्ट असल्याने त्याचा कारभार वेगळा आहे.



दरवर्षी ऑडिटचे कागदपत्र देखील माहिती अधिकारात मिळत नाहीत.

फेब्रुवारी २०२५ अखेर एसटीने स्वतंत्र असलेल्या सात विभागांतून २३८ कोटी रुपये घेतले. त्यामध्ये मृत व्यक्तीचे वारसदारांना आर्थिक सहाय्य होणाऱ्या अपघात सहाय्यता निधी योजनेतून पैसे नियमबाह्य घेतल्याचे उघडकीस आले आहे. सदर रक्कम ही धर्मदाय आयुक्त यांचे कडे ज्या उद्देशाने ट्रस्ट केला त्या उद्देशालाच हरताळ फासला गेला आहे.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना प्रवासी महासंघातर्फे निवेदन पाठवून व्याजासहित रक्कम भरावी अशी मागणी केली आहे. वैयक्तिक देणी, भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी ठेव निगडित विमा उपदान विश्वस्त मंडळ आदी महत्त्वाच्या सात खात्यांचा समावेश असल्याचे समजते. अपघात सहाय्यता ट्रस्टचे कामकाज व अनियमितता, ऑडिट दिरंगाईबाबत माजी खा. भाऊसाहेब वाकचौरे, आ. हेमंत ओगले यांनी परिवहन मंत्री ना सरनाईक यांचे लक्ष वेधले आहे.

> अपघात सहाय्यता ट्रस्टचे कामकाज पारदर्शक असल्याबाबत अपयश आल्याने प्रवासी व जनतेत संशयाचे वातावरणाची चर्चा दिसून येते. सातत्याने ऑडिट न झाल्यास हे ट्रस्ट रद्द करण्याची नामुष्की राज्य परिवहन मंडळावर येणार आहे. वार्षिक जमा खर्च व ऑडिट हे आगार स्तरावर प्रवाशांना माहितीसाठी उपलब्ध करण्याचे धाडस दाखवावे.
>
> **– रणजीत श्रीगोड**

# अंगणवाडीत नवागतांचा प्रवेशोत्सव

## वनिता दुधाट व ज्योती निमसे केले नवागतांचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या नियोजनानुसार राहुरी तालुक्यातील म्हैसगावच्या केदारेश्वर ठाकरवाडी अंगणवाडीत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव २०२५-२६ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी अंगणवाडी सेविका वनिता दुधाट व मदतनीस ज्योती निमसे यांनी चिमुकल्याचे उत्साहात स्वागत केले.

म्हैसगाव येथे दि. १६ जून २०२५ रोजी केदारेश्वर ठाकरवाडी येथील अंगणवाडी क्रमांक २२२ च्या वनिता दुधाट व ज्योती निमसे या कर्मचाऱ्यांनी नवागतांचे स्वागत केले. यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. तसेच उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना वृक्ष, गुलाब व पुस्तक देवून मुलांमध्ये शाळेविषयी प्रेम निर्माण होवून त्यांना मराठी शाळेविषयी गोडी निर्माण व्हावी, यासाठी प्रयत्न केला.



यावेळी मराठी शाळेच्या मुख्याध्यापिका शिल्पा साळवे, प्रज्ञा शेवाळे, अंगणवाडी सेविका वनिता दुधाट, मदतनीस ज्योती निमसे, पालक सिंधुबाई पारधे, सोनाली पारधे, ज्योती पारधे, गीताबाई पारधे, उज्वला पारधे यासह आदी पालक उपस्थित होते.

# प्रतीक्षा सोनवणे यांचा आदर्श सूत्रसंचालन पुरस्काराने गौरव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : स्नेहबंध सोशल फाउंडेशनच्या वतीने प्रतीक्षा सोनवणे यांना आदर्श सूत्रसंचालन पुरस्काराने गौरविण्यात आले. आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते सोनवणे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शहरात झालेल्या महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान सोहळ्याप्रसंगी उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, पोलीस उपाधीक्षक अमोल भारती, शिल्पकार प्रमोद कांबळे, अमित खामकर, स्नेहबंधचे संस्थापक डॉ. उद्धव शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## पाकिस्तानच्या विनंतीवरून युद्धबंदी

भारताने हे देखील स्पष्ट केले होते की आम्ही पाकिस्तानच्या गोळीचे उत्तर गोळ्यांनी देऊ. २२ एप्रिल रोजी काश्मीरमधील पहलगाममध्ये ५ दहशतवाद्यांनी २६ पर्यटकांची गोळ्या घालून हत्या केली. दुसऱ्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत भारताने पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठी ५ मोठे निर्णय घेतले. यामध्ये ६५ वर्षे जुना सिंधू पाणी करार रद्द करण्यात आला. अटारी चेकपोस्ट बंद करण्यात आला. व्हिसा बंद करण्यात आला आणि उच्चायुक्तांना काढून टाकण्यात आले. यानंतर, ७ मे रोजी भारताने ऑपरेशन सिंदूर अंतर्गत हवाई हल्ल्याद्वारे पाकिस्तानमधील अनेक दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले.

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पादुका पूजन

सोहळ्यासाठी ३ बैलजोड्या खरेदी केल्या आहेत. प्रमुख दिंड्याच्या उपस्थित व वारकरी भाविक भक्तांसह हरिनामाच्या गजर करत टाळ-मृदंगाच्या निनादात, गरुड, टक्के यांच्या समवेत सायंकाळी ५ वाजता पालखी मंदिर प्रदक्षिणा घालून मुख्य मंदिरातून प्रस्थान होईल. सायंकाळी ६.३० वाजता पालखी प्रस्थान सोहळा श्री तुकोबारायांच्या आजोळी म्हणजे इनामदारसाहेब वाड्यात पहिल्या मुक्कामासाठी विसावणार आहे. त्या ठिकाणी आरती होऊन रात्री देहूकर महाराजांचे कीर्तन, हरिनामाचा जागर असे धार्मिक कार्यक्रम होतील.

## पवारांकडून फडणवीसांचे कौतुक

घ्यायचा दृष्टीकोन ठेवला असता तर ही परिस्थिती आली नसती. म्हणजे झाले ते ठीक झाले, असे म्हणत शरद पवार यांनी याविषयी अधिक बोलणे टाळले आहे. काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआयचा वापर करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे महाराष्ट्र सरकारने आता यासाठी ५०० कोटींचा निधी जाहीर केला आहे. या निर्णयाचे शरद पवार यांनी कौतुक केले. देवेंद्र फडणवीस यांनी निर्णय घेण्याचे धाडस दाखवले आहे. देशातील महाराष्ट्र हे कृषी क्षेत्रात एआय स्वीकारणारे पहिले राज्य ठरले असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे. त्यामुळे मी सरकारचे आणि देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करत असल्याचे देखील शरद पवारांनी म्हटले आहे.

## 'राज' हिंदीच्या सक्तीवर आक्रमक

बोलणे चालू होते. आपण हिंदीची सक्ती करणार नसल्याचे तसेच हा निर्णय मागे घेणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते, असा दावा देखील राज ठाकरे यांनी केला आहे. त्यामुळे आता राज्यातील सर्व मुख्याध्यापकांना आज माझे पत्र जाणार असल्याचे राज ठाकरे यांनी सांगितले. यावेळी मुख्याध्यापकांना लिहिलेले पत्र देखील राज ठाकरे यांनी वाचून दाखवले. सरकारला हिंदी भाषा का लागत आहे? असा प्रश्न राज ठाकरे यांनी विचारला आहे. सरकारच्या या निर्णयामागे लॉबीचा दबाव आहे का? अशी शंका देखील राज ठाकरे यांनी उपस्थित केली. गुजरातमध्ये हिंदी सक्तीची नाही, मग महाराष्ट्रावर का लादत आहात? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे. केंद्रात नरेंद्र मोदी आणि अमित शहा असताना गुजरातमध्ये हिंदी सक्तीची का नाही? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.ीच भाषा प्राथमिक असायला हवी. हिंदी सक्ती हा मराठी भाषेचा अपमान आहे.

## बँकेत नियमबाह्य नातेवाईक भरती भोवली

त्यामुळे रिजर्व्ह बँकेने प्रथम लेखी पत्र दिले. त्यालाही संचालकांनी केराची टोपली दाखवली आता पुन्हा दुसरे स्मरण पत्र आले आहे. आता संचालक मंडळ काय भूमिका घेतात? याकडे सभासदांचे लक्ष लागले आहे.

## वारकरी सेवा हिच खरी ईश्वरीय सेवा

वारकरी पगडी, शेला, तुळशी हार देवून सन्मान करण्यात आला. ४७ वर्षांची परंपरा असलेल्या दिंडीचे ३२ वर्षापासून प्रसिद्ध व्यापारी नारायण अग्रवाल हे वारकरी यांची भोजन, निवास सुविधा उपलब्ध करुन देत विविध वस्तुंचे वाटप करतात. या वर्षीही वारकऱ्यांना प्रवासी बॅगचे वितरण करण्यात आले. तसेच रोटरी क्लबच्या वतीने वारकऱ्यांना रोटरीची शिदोरी म्हणून लोणचे, ठेचा पदार्थ देण्यात आले. स्वागत नारायण अग्रवाल यांनी तर सुत्रसंचालन स्वच्छतादूत सुशांत घोडके यांनी केले. योगेश जोबनपुत्रा व विरेश अग्रवाल यांनी आभार मानले.

## एसपींचा आदेश अन् सुगंधी तंबाखूवर कारवाई

कुणाल संजय पिसाळ (रा. भगतसिंग चौक), शहाबाज ताहेर खान पठाण, आफताब ताहेरखान पठाण (रा. बंधन लॉन्स) असे राहते घरात गिरणीचे सहाय्याने कच्ची व पक्की सुपारीमध्ये संगुधीत तंबाखु मिसळुन मावा करुन विक्री करतात, अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी तात्काळ विशेष पोलीस पथक व पंच यांना बोलावून खाजगी वाहनाने रवाना करून वेगवेगळ्या ठिकाणी पंचासमक्ष छापे टाकले असता सदर आरोपींच्या घरात सुगंधीत तंबाखु, मावा तयार करण्याचे मशीन असा एकुण जवळपास ४ लाखांचा मुद्देमाल मिळुन आला. प्रशांत चंद्रकांत आंधळे यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'अमृतवाहिनी'ला युजीसीकडून 'स्वायत्त दर्जा'

आणता येणार असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नवीन अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी नव्या दिशा खुल्या झाल्या आहेत. २००४ साली स्थापन झालेल्या महाविद्यालयाने शैक्षनणीक व संशोधन शेत्रात भरीव कामगिरी केली आहे. महाविद्यालयास कडून मानांकन, तसेच कडून २ (एफ) व १२ (बी) अंतर्गत मान्यता प्राप्त झाली आहे. महाविद्यालयात अत्याधुनिक सुविधायुक्त सक्षम प्रयोगशाळा उभारण्यात आली आहे. या यशाबद्दल अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे अध्यक्ष थोरात, डॉ. सुधीर तांबे, शरयु देशमुख, अनिल शिंदे, डॉ. जे. बी. गुरव यांनी आनंद व्यक्त केला.

# बालवैज्ञानिक परीक्षेत 'आत्मा मालिक अव्वल'

## ३७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत तर श्रेयश नलावडे राज्यात प्रथम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** जनसेवा सामाजिक, शैक्षणिक प्रतिष्ठान आयोजीत राज्यस्तरीय डॉ. सी.व्ही रमन बालवैज्ञानिक स्पर्धा परीक्षेत आत्मा मालिक शैक्षणिक व क्रीडा संकुलाच्या आत्मा मालिक सेमी इंग्लिश मिडीयम गुरुकुलाच्या ३७ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. या मध्ये श्रेयश नलावडे हा राज्यात प्रथम आला असून श्रेयष भवर राज्यात तृतीय, उन्नती सात्रस व मनस्वी सोनवणे राज्यात पाचव्या स्थानी चमकले आहेत.

विद्यार्थ्यांमध्ये संशोधनात्मक वृत्ती वाढविणे, विज्ञानाची अभिरुची व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे हा या परीक्षेमागील मुख्य उद्देश असून आत्मा मालिकमध्ये विज्ञान विषयाचे विविध उपक्रम राबविले जातात. तसेच विज्ञानाच्या विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करुन घेतली जाते. त्यामुळे हे यश प्राप्त झाल्याचे प्राचार्य निरंजन डांगे यांनी सांगितले आहे. गुणवत्ता यादीत आलेल्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय विज्ञान कार्यशाळेसाठी निवड झालेली आहे.



यामध्ये यश कणके, स्वरा झावरे, धनंजय दहिफळे, श्लोक कदम, सुजितकुमार गोल्हार, धनश्री रक्ताटे, तनिष्क शिंदे हे विद्यार्थी जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत चमकले. सिध्दार्थ भोसले, राज हासे, तनिष्का कोरडे, सुयश शिंदे, विश्वजीत त्र्यंबके, प्रांजल काळे, करण चारवंडे, शुभांगी गोलांडे, युविका पराडके, आराध्य गुरसळ, दर्शन गिरासे, श्रीतेज इंगोले, ज्ञानेश्वरी काळे, सिध्दार्थ पगारे, स्वरुप शेळके, भावेश पाचारणे, भाविका देवरे, आराध्य दिघे, मंगेश कदम, राजवीर कालेकर, नयन कणकाल, आदित्य पाटोळे, तेजस चोंडगीर, तन्मय गाडेकर, मल्हार कजबाजे, सार्थक पाटील या विद्यार्थ्यांनी तालुका गुणवत्ता यादीत बाजी मारली आहे.

या विद्यार्थ्यांना प्राचार्य निरंजन डांगे, विभाग प्रमुख सचिन डांगे, अनिल सोनवणे, मीना नरवडे, सागर आहिरे, रविंद्र देठे, रमेश कालेकर, बाळकृष्ण दौंड, पर्यवेक्षक गणेश रासने, नयना शेटे, सुनिल पाटील, नितीन अनाप यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे परमपुज्य आत्मा मालिक माऊलींच्या कृपाशिर्वादासह संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन विश्वस्त प्रकाश गिरमे, प्रदिपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे, प्राचार्य निरंजन डांगे आदिंनी अभिनंदन केले.

## पॉलिटेक्निक ऑनलाईन प्रवेशासाठी मुदतवाढ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने पॉलिटेक्निकमध्ये प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश नोंदणी अर्ज भरण्यासाठी दि. २६ जून पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहीती प्राचार्य डॉ. विजयकुमार राठी यांनी दिली.१० वी आणि १२ वीच्या परिक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. डिप्लोमा प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून केंद्रीभूत ऑनलाईन प्रवेश नोंदणी अर्ज स्विकारले जात आहेत. काही विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कागदपत्रांना होणाऱ्या दिरंगाईमुळे प्रथम वर्ष प्रवेश नोंदणीसाठी दि. २६ जून पर्यंत ऑनलाईन प्रवेश नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. पद्मश्री विखे पाटील पॉलिटेक्निक येथे केंद्रीभूत ऑनलाईन प्रवेश सुविधा व मार्गदर्शन केंद्र सुरू असून या केंद्रामध्ये तज्ञ मार्गदर्शकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांना प्रवेशासंबंधीची सविस्तर माहिती, नियम, ऑनलाईन ऑप्शन फॉर्म भरणे, पसंती क्रमांक देणे सहजसुलभ होणार आहे. प्रवेश सुविधा केंद्रासाठी स्वतंत्र अद्ययावत प्रवेश व मार्गदर्शन कक्ष स्थापन केला आहे. विद्यार्थ्यांनी माहितीसाठी प्राचार्य डॉ. विजयकुमार राठी आणि एफ सी सेंटर प्रा. वसिम तांबोळी, प्रा. आर. व्ही. लावरे, द्वितीय वर्ष समन्वयक प्रा. एन. एम.गरड यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## जिल्हा कार्याध्यक्षपदी भोगे यांची निवड



**नेवासा :** तालुक्यातील खरवंडी येथील प्रगतशील शेतकरी व सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब भोगे यांची जनता दल सेक्युलर महाराष्ट्र पक्षाच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली. महाराष्ट्र जनता दल सेक्युलर पक्षाची महाराष्ट्र प्रदेशची कार्यकरिणीची बैठक नुकतीच मुंबई येथे पार पडली. राज्याचे प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे यांच्या अध्यक्षतेखली झालेल्या बैठकीत नेवासा तालुक्यातील खरवंडी येथील बाबासाहेब भोगे यांची अहिल्यानगर जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्तीचे पत्र त्यांना देण्यात आले. यावेळी राज्यातील निवडक पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते बाबासाहेब भोगे पाटील हे गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक राजकीय क्षेत्रात काम करण्याचे तळमळ पाहता चळवळीतील कार्यकर्ता म्हणून जनता दल सेक्युलर यांनी त्यांना पक्षाचे कार्याध्यक्षपदी निवड करून त्यांना सक्रिय राजकारणात महत्त्वाचे पद दिले आहे. राजकीय सामाजिक कृषी क्षेत्रातील त्यांचे काम पाहता त्यांना नगर जिल्ह्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.या पक्षाची धुरा त्यांच्या खांद्यावर दिल्याने नेवासा तालुक्यातसह अहिल्या नगर जिल्ह्यात पक्ष वाढीस मदत करणार असल्याचे बाबासाहेब भोगे यांनी सांगितले.

## पावसाचे नगर जिल्ह्यात सात बळी; ११ जखमी

### ५३ जनावरे दगावली, २६१ घरांसह जनावरांच्या गोठ्यांची पडझड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** यंदा उन्हाळ्याच्या शेवटच्या टप्प्यात म्हणजेच मे महिन्यांत नगर जिल्ह्यात झालेल्या वादळी पावसात आतापर्यंत ७ जणांचे बळी गेले असून ११ नागरिक जखमी झाले आहेत. यासह २६ मोठी तर २७ लहान जनावरे मृत्यूमुखी पडले असून २४१ घरांसोबत २० जनावरांचे गोठे पडले आहेत. जिल्हा प्रशासनाच्या अहवालावरून ही माहिती समोर आली आहे.

यंदा मान्सून पूर्व पावसाने जिल्ह्याच्या दक्षिण भागाला सुरूवापासून झोडपून काढले. यात अहिल्यानगर, पाथर्डी, शेवगाव, कर्जत, नेवासे आणि जामखेड या तालुक्यासह राहुरीचा काही भाग, अकोले तालुक्याच्या



### शेती पिकांचे पंचनामे सुरू

जिल्ह्यात मे महिन्यांत भाग बदलत जोरदार पाऊस झाला असून यामुळे उन्हाळी हंगामातील कांदा, चारा पिके व फळबागांचे म ोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. अनेक ठिकाणी उघडीप देत पुन्हा पुन्हा जोरदार पाऊस झालेला असून यामुळे शेती पिकांच्या नुकसानाची माहिती संकलन सुरू असल्याचे सांगण्यात आले.

काही भागाचा समावेश आहे. या पावसामुळे घरांसह शेतात उभे असणारे चारा पिके, फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. विज पडून अथवा अंगावर भिंत झाड पडून जिल्ह्यात आतापर्यंत ७ जणांचा बळी गेला आहे. यात नगर २, अकोले १, नेवासा १, राहुरी १ आणि कर्जतमधील दोघांचा सामावेश आहे. यासह नगर १, कर्जत १, राहुरी २ आणि श्रीगोंदा तालुक्यातील ७ असे ११ व्यक्ती जखमी झालेले आहेत. वादळी पावसामुळे जिल्ह्यात २६ मोठी आणि लहान २७ जनावरे पावसात मृत्यूमुखी पडली आहेत. यात नगर २० लहान जनावरे, अकोले ३ मोठे आणि १ लहान, जामखेड ४ मोठे, कोपरगाव ३ लहान, नेवासा १ लहान, पाथर्डी २ मोठी व ४ लहान, पारनेर १ लहान, संगमनेर ४, शेवगाव १ मोठे, श्रीगोंदा ६ म ोठे यांचा समावेश आहे. जिल्ह्यात सर्वाधिक घरांची पडझड संगमनेर ४४, नेवाशात ४१, कर्जत २९, राहुरी २०, पाथर्डी १९, श्रीगोंदा, अकोले आणि पारनेर प्रत्येकी१६, जामखेड १३, कोपरगाव आणि श्रीरामपूर प्रत्येकी ६, राहाता आणि नगर प्रत्येकी ३ यांचा समावेश आहे.

## पुण्यात घर घेण्यासाठी १५ लाखांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** पुण्यात घर घेण्यासाठी माहेरून १५ लाख रूपये आण, अन्यथा परिणाम भोग असा दम देत सतत मानसिक व शारिरीक छळ झाल्याचा आरोप करत एका विवाहितेने तिच्या पतीसह सासरच्या पाच सदस्यांविरोधात तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. सासरच्यांकडून झालेल्या छळामुळे पीडित महिलेचा गर्भपात झाल्याचाही दावा फिर्यादीत करण्यात आला आहे.

फिर्यादी सावेडीच्या यशोदानगर परिसरात राहतात. त्यांचा विवाह अमोल हनुमंतराव गोपाळघरे (रा. संचारनगर, माउली मंदिराजवळ, सावेडी) याच्याशी झाला होता. सुरूवातीच्या काही महिन्यानंतर पती अमोल याचे वागणे विक्षिप्त असून तो कोणतेही काम करत नसल्याचे लक्षात आल्याचे फिर्यादीत नमूद केले आहे. फिर्यादीने फॅशन डिझायनिंगच्या व्यवसायातून मिळणाऱ्या पैशांतून घरखर्च चालवायला सुरूवात केली. मात्र पती अमोल सतत तिच्या पैशांवर डोळा ठेवून चोरी करत होता. सासरे हनुमंतराव व सासू अरूणा यांनीही वारंवार मानसिक व शारिरीक त्रास दिला. सासरच्यांनी पुण्यात घर घेण्यासाठी व पाईपलाईन रस्ता येथे गाळा विकत घेण्यासाठी तिच्या माहेरून १५ लाख रूपये आणण्याचा तगादा लावला. सासरच्यांनी शिवीगाळ व मारहाण केली. सासरे हनुमंतराव यांनी पोलीस खात्यात ओळख असल्याचे सांगून खोट्या केसेस टाकण्याची धमकी दिली. ननंद दिपाली व तिचा पती सुरेश ढाकणे यांनीही सासरच्या मंडळींना भडकवून मानसिक त्रास दिल. या प्रकरणी पती अमोल गोपाळघरे, सासरे हनुमंतराव रामराव गोपाळघरे, सासू अरूणा हनुमंतराव गोपाळघरे, ननंद दिपाली सुरेश ढाकणे, ननंदेचा पती सुरेश रमेश ढाकणे (सर्व रा. संचारनगर, तपोवन रस्ता, माउली मंदिराजवळ, सावेडी) यांच्याविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आ. विठ्ठलराव लंघे यांच्या उपस्थितीत गेवराई येथे शाळा प्रवेशोत्सव उत्साहात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गेवराई येथे शाळा प्रवेशोत्सव २०२५-२६ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी भूषवले.

कार्यक्रमात नवागत विद्यार्थ्यांचे हार्दिक स्वागत करण्यात आले तसेच सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके, शूज-सॉक्स व शैक्षणिक साहित्य आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. शाळेचे वातावरण व शिक्षकांचा उत्साह पाहून आमदार लंघे यांनी शिक्षकांचे विशेष कौतुक केले.या प्रसंगी उपस्थित मान्यवरांम ध्ये गटशिक्षणाधिकारी साईलता सामलेटी, शमी शेख, राम शिंदे, अनिता कर्डिले (सरपंच), सोमनाथ पाटेकर (शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष), सोपानराव कर्डिले, दिलीपराव काकडे, निलेश कर्डिले, बापूराव बिडकर, संभाजी राजे जगताप, ज्ञानेश्वर कर्डिले, गोरक्षनाथ भागवत, काकासाहेब गोरे, कैलास काळे, मामा विनायक कर्डिले, रमेश भालेकर, आसाराम कर्डिले, समीर पाटेकर, ज्ञानेश्वर आदमाने, गोरक्षनाथ बर्वे, अमोल बर्वे, शंकरराव खाटीक, शंकरराव शिरसाट यांचा सम ावेश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रामेश्वर चोपडे यांनी केले, सूत्रसंचालन रमेश राऊत यांनी केले, तर आभार प्रदर्शन बापूसाहेब सोनवणे यांनी मानले.

## पालकांनी संयम पाळावा: पोलीस अधिक्षक घार्गे

### तज्ज्ञांचा पालकांशी मुक्त संवाद; पास अकॅडेमीचा उपक्रम



**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** आपण आपल्या जीवनात जे करू शकलो नाही ते आपल्या पाल्यांनी करावे, असे पालकांना सातत्याने वाटत असते. त्यामुळे बालकांवर अपेक्षांचं ओझं लादलं जातं. परिणामी बालकांवर ताण वाढत जातो. बालकांकडून यशाची अपेक्षा केली जाते व इतर मुलांशी तुलना केली जाते. पालकांचा संयमच संपला आहे. पालकांनी संयम पाळावा म्हणजे बालके ताण विरहित यश संपादन करू शकतील असे उद्गार जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पास अकॅडेमीने आयोजित केलेल्या 'पालकांशी मुक्त संवाद' या कार्यक्रमात काढले.

याप्रसंगी पास अकॅडेमीच्या संचालिका प्रा. डॉ. आश्लेषा भांडारकर म्हणाल्या की, ''जागतिकीकरणाच्या कालखंडात उदारीकरण व खाजगीकरण या मुळे पालकांच्या महत्वाकांक्षा वाढल्या आहेत. त्यामुळे पालकांची भूमिका बदलली आणि विद्यार्थ्यांमध्ये नव्हे तर पालकांमध्ये चुरस व स्पर्धा वाढीस लागली, परिणामी पालक अति सजग झालेत. त्याचा विपरीत परिणाम बालकांच्या शैक्षणिक विकासावर होत आहे. म्हणून पालकांनी आपल्या आकांक्षा, अपेक्षा व आपली ध्येये बालकांवर लादू नयेत.''

मानसशास्त्रज्ञ नयना डिन्नी यांनी विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय विकासावर विशेष प्रकाश टाकला. प्रत्येक बालकाचा पिंड हा भिन्न असतो. त्याच्या क्षमता, योग्यता, कौशल्ये, अध्ययन क्षमता व समायोजन क्षमता वेगवेगळ्या असतात. त्यामुळे त्यांच्या संभाषणाच्या व व्यक्त होण्याच्या पद्धती सुद्धा वेगळ्या असतात.

## विखे पाटील महाविद्यालयात सामाजिक उपक्रम साजरा




**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** श्रमदान, परिसर स्वच्छता आणि अनाथ मुलांना भोजन देत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा वाढदिवसानिमित्त लोणी पद्मश्री विखे पाटील कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व विद्यार्थ्यांनी गंगाधर बाबा छात्रालय, गुहा या ठिकाणास भेट देऊन अन्नदान करण्यात आले. छात्रालयाचे व्यवस्थापक प्रकाश सपकाळ त्यांनी मंत्री विखे पाटील यांना जन्मदिवसाच्या शुभेच्छा देऊन गंगाधर बाबा छात्रलयातील स्तुत्य उपक्रमांविषयी माहिती दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक घोलप यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी प्रा. नंदकुमार दळे, प्रा. वैशाली कडलग यांनी ही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा. बाळासाहेब गाडेकर यांनी केले व प्रा. रमेश थेटे यांनी आभार व्यक्त केले.

# रेशीम शेतीतून गवसला आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग

## गतवर्षात ८५ लाखांचे अनुदान वितरित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** रेशीम उद्योग हा ग्रामीण भागातील स्वावलंबनासाठी अत्यंत उपयुक्त पर्याय असून विशेषतः महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवण्यात हा व्यवसाय मदत करू शकतो. मागील वर्षात जिल्ह्यात ६६८ शेतकऱ्यांनी ३१६ हेक्टर क्षेत्रावर तुतीची लागवड करुन २ लाख ६५ हजार अंडीपुंज व १५१ मेट्रीक टन कोषाचे उत्पादन घेतले आहे. गतवर्षात रेशीम शेतीसाठी १०२ शेतकऱ्यांना ८५ लाख ४४ हजार रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले असल्याची





माहिती जिल्हा रेशीम विकास अधिकारी संदीप आगवणे यांनी दिली.

रेशीम शेती उद्योग हा कृषीवर आधारित रोजगाराची प्रचंड क्षमता असलेला व ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी मदत करणारा उद्योग आहे. बदलते हवामान, बाजारातील शेतीमालाच्या बाजारभावाची चढउतार आणि वाढती महागाई यामुळे शेतकऱ्यांना शेती परवडत नाही. पारंपारिक शेतीबरोबरच शेतीला जोडधंदा म्हणून उद्योग करणे आता गरजेचे झाले आहे. जिल्ह्याचे वातावरण रेशीम शेती उद्योग वाढीसाठी अत्यंत अनुकूल आहे. श्रम शक्ती, उपलब्ध पाणी स्त्रोत आणि जमिनीच्या आधारे रेशीम उद्योगाला घडवत ग्रामीण स्वावलंबनाचा धागा विणण्यास जिल्ह्याने सुरुवात केली आहे. रोजगाराचा नवा मार्ग म्हणून रेशीम व्यवसायाची जिल्ह्यात उभारी पहावयास मिळत आहे.

रेशीम उद्योगापासून नियमित शाश्वत उत्पन्न मिळू शकते. एकदा तुती लागवड केली की १२ ते १५ वर्ष लागवडीचा खर्च येत नाही. तसेच एकदा किटक संगोपन गृह बांधले व साहित्य खरेदी केली की पुन्हा खर्च येत नाही. तुती रोपांची लागवड केल्यापासून ३ ते ४ महिन्यात तुती बाग किटक संगोपनासाठी योग्य होते. कमी पाण्यातही तुती जगत असल्यामुळे उन्ह्याळ्यात अथवा दुष्काळात दोन महिने पाणी नसतानाही तद्नंतर मिळालेल्या पाण्यावर बागा पून्हा उगवून येते. कीड व रोग नैसर्गिक आपत्ती जसे अवकाळी पाऊस, गारपीट पासुन बागेस विशेष नुकसान होत नाही. इतर बागायती पिकांच्या तुलनेत तुतीच्या झाडांना पाणी कमी लागते. संगोपनातील कचरा, काड्या, अळ्यांची विष्ठा, खाऊन राहिलेला पाला हे कुजवून चांगले खत तयार होते व हा काडीकचरा गांडूळास दिल्यास अतिशय चांगल्या प्रकारे गांडूळ खत या पासून मिळते.

### बँकेकडून अर्थसहाय्य

रेशीम शेती उद्योग सुरु करण्यासाठी शेतकऱ्यांना भांडवल उभारणीसाठी मोठी अडचण येते. यासाठी नाबार्डने सन २०२४ - २०२५ साठी सुधारित निकषास मान्यता दिलेली आहे. रेशीम उद्योगासाठी प्रकल्प मूल्य ६ लाख ५२ हजार ५१५ इतके निश्चित केले असून त्यापैकी ९० टक्के रक्कम बँकेकडून कर्ज स्वरुपात उपलब्ध होणार आहे. याशिवाय जिल्हा सहकारी बँकेमार्फत तुती लागवड व्यवस्थापन व संगोपन खर्चासाठी कमाल १ लाख ८५ हजार रुपये पीककर्ज उपलब्ध होणार आहे.

# विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे ज्ञान प्राप्त होणार

## माजी मंत्री थोरात व डॉ. तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली थोरात महाविद्यालयात डेटा सायन्स अभ्यासक्रमाला मान्यता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या काळात विद्यार्थ्यांना नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचे ज्ञान प्राप्त व्हावे यासाठी माजी शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात व मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारमहर्षी भाऊसाहेब संतुजी थोरात कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व शासनाकडून बी.एस्सी. डेटा सायन्स, एम. एस्सी. इन कॉम्प्युटर एप्लीकेशन तसेच बी.एस्सी. कॉम्प्युटर सायन्स या वर्गाच्या अतिरिक्त तुकडीस मान्यता मिळाली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. बाळासाहेब वाघ यांनी दिली आहे.

याबाबत अधिक माहिती देताना प्राचार्य वाघ म्हणाले की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात व मा. आ. डॉ. सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली सह्याद्री महाविद्यालयाने सातत्याने गुणवत्तेतून आपला लौकिक निर्माण केला आहे. विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये करिअरची संधी निर्माण करून दिली आहे. नवीन बदलत्या काळानुसार माहिती तंत्रज्ञान या अत्यंत गरजेचे आहे.

यामधील डेटा सायन्स हा अभ्यासक्रम अभ्यासक्रम हा तीन वर्षाचा असून यासाठी महाविद्यालयाने अद्यावत प्रयोगशाळा देखील उभारली आहे. संगमनेर परिसरातील व ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून संस्थेने अत्यंत माफक फी मध्ये वरील अभ्यासक्रम शिकण्याची सुविधा महाविद्यालयाकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे. डेटा सायन्स सारख्या अभ्यासक्रमात पदवी घेणाऱ्या विद्यार्थ्यांना देश विदेशातील नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या व्यापक संधी उपलब्ध होत आहेत.

अलीकडील बदलत्या काळात ए. आय व डेटा सायन्स यांचा प्रभाव वाढत असून तरुणांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत. आय.टी.क्षेत्र, उद्योग, व्यवसाय, बँकिंग, शेती, मेडिकल आदी क्षेत्रात ए.आय व डेटा सायन्स सारख्या तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे महाविद्यालयात सुरू करण्यात आलेल्या या नवीन अभ्यासक्रमांसाठी संगमनेर शहर व परिसरातील विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

### ... आता रोजगाराभिमुख करिअरची व्यापक संधी

रोजगाराभिमुख व कालसुसंगत आणि करिअरच्या व्यापक संधी उपलब्ध करून देणाऱ्या अभ्यासक्रमांना महाराष्ट्र शासनाची परवानगी मिळाल्याने संस्थेचे मार्गदर्शक माजीमंत्री बाळासाहेब थोरात,अध्यक्ष डॉ.सुधीर तांबे, संस्थेचे सचिव सुमंत कोल्हे, सहसचिव.बाबुराव गवांदे, रजिस्टार उमेश डोंगरे यांनी समाधान व्यक्त केले आहे.



# ‘विधी’त उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान

## कर्मयोगी प्रतिष्ठानतर्फे विद्यार्थ्यांचा सन्मान व वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नुकत्याच पार पडलेल्या विधी विभागाच्या परिक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन यश संपादन केल्याबद्दल कर्मयोगी प्रतिष्ठानतर्फे सदर विद्यार्थी-विद्यार्थीनींचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी कर्मयोगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष शफि जहागिरदार यांनी हजरत मिरावली पहाड येथे स्नेह भोजन आयोजित केले होते. शिक्षण आणि कामासोबत सामाजिक कार्याची आवड निर्माण व्हावी, या हेतूने सदर विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. ॲड. सानिया चुडीवाला, ॲड. अरीबा शेख, ॲड. नोमान जहागिरदार त्याचबरोबर बारावीची निदा चुडीवाला हिचा देखील सत्कार करण्यात आला व झाडे भेट देण्यात आली. कर्मयोगी प्रतिष्ठानचे माजी जिल्हा समाजकल्याण अधिकारी रफ़िक मुन्शी, मोहसीन बारुदवाले, डॉ. इमरान शेख, समिरखान यांनी सर्व विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.



# आ. पवारांच्या प्रतिनिधीला मारहाण

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने निषेध; पोलीस निरीक्षकांना दिले निवेदन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत नगरपंचायतच्या जनरल बॉडी बैठकीमध्ये आ. रोहित पवार यांच्या प्रतिनिधीवर हल्ला करण्याची खळबळजन घटना १६ जून रोजी घडले आहे. याप्रकरणी काल दि. १७ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी कर्जत पोलीस स्टेशन बाहेर जोरदार घोषणाबाजी करून या घटनेचा निषेध केला व संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करणारे निवेदन पोलीस निरीक्षक सुनील शिरसाठ यांना दिले आहे.



यावेळी माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत, नितीन धांडे, ऋषिकेश धांडे, रज्जाक झारेकरी, सोमनाथ यादव, राहुल नवले, रामेश्वर तोरडमल, दीपक यादव, प्रतीक ढेरे, महादेव खंदारे, सौरभ पाटील, अभिजीत महामुनी, संजय भिसे, नामदेव थोरात, सचिन मांडगे, मनोज गायकवाड यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे की, कर्जत नगरपंचायतची जनरल बॉडी ची बैठक १६ जून रोजी सुरू होती. यावेळी त्या ठिकाणी आ. पवार यांची दोन प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी नगराध्यक्ष रोहिणी घुले यांचे कार्यकर्ते आणि संबंधित पदाधिकाऱ्यांकडून शिवीगाळ दमदाटी आणि मारहाण करण्याची घटना घडली आहे. तसेच आमदार रोहित पवार यांच्यावर अत्यंत असलेली शब्दांमध्ये शिवीगाळ करण्यात आले आहे.

आ. पवार यांचे प्रतिनिधी समन्वयक हे संयमाने सभागृहामध्ये बसलेल्या असताना त्यांच्यावर मारहाण करून शिवीगाळ देखील करण्याची लज्जास्पद घटना घडली आहे. या घटनेचा आम्ही निषेध करतो व अशा पद्धतीने सत्तेचा गैरवापर करणे व सर्वसामान्य नागरिक जनता यांच्यावर दहशत निर्माण करणे चुकीचे आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

# पोलीस शिपाईसह एकाला लाच घेताना पकडले

## तीन आरोपींच्या विरोधात लाच प्रकरणी गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : पाथर्डी पोलीस स्टेशनमधील पोलीस शिपाई लक्ष्मण सुखदेव पोटे, पोलीस नाईक रामदास जयराम सोनवणे व आरोपी राहुल शिवाजी साबळे या तिघांविरोधात एका हॉटेल चालकाकडून पंधराशे रुपयांची लाच घेतल्याप्रकरणी नाशिक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करत गुन्हा दाखल केला. यावेळी शिपाई लक्ष्मण पोटे याला अटक करण्यात आली आहे. तर पोलिस नाईक सोनवणे हा लाचेच्या रकमेसह फरार झाला आहे.

तक्रारदाराचे मिसळचे हॉटेल रात्री दहानंतर चालू ठेवले जाते. यावर कारवाई नको असेल तर मासिक हप्ता दोन हजार रुपये द्यावा लागेल, असे सांगून आरोपी शिपाई पोटे याने तडजोड करून पंधराशे रुपयांची लाच मागितली होती. ही तक्रार १५ जून रोजी लाचलुचपत विभागाकडे दिल्यानंतर पडताळणी दरम्यान लाचेची मागणी निश्चित झाली.

दि. १७ जून रोजी पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात पोटे यांनी वैद्यकीय तपासणीसाठी आणलेल्या पोलिस कोठडीतील आरोपी राहुल साबळे याच्याकडून तक्रारदाराकडे लाच रक्कम घेण्यास सांगितले. साबळे याने तक्रारदाराकडून पंधराशे रुपये घेतले आणि ते पोलीस नाईक सोनवणे याच्याकडे सुपूर्त करत असताना सोनवणे हा लाचेच्या रकमेसह घटनास्थळावरून फरार झाला.

या कारवाईत आरोपी लक्ष्मण पोटे याला ताब्यात घेण्यात आले असून, पोलिस नाईक सोनवणे व आरोपी साबळे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींच्या ताब्यातून पोटे याचा वापरता मोबाईल व साबळे याचे शर्ट-पँट जप्त करण्यात आले आहेत.

ही कारवाई पोलीस उपअधीक्षक अनिल बडगुजर यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. तपास पोलीस निरीक्षक राजू आल्हाट करीत असून पोहेकॉ दीपक पवार, पोकॉ संजय ठाकरे, चापोना परशुराम जाधव या पथकाने कारवाईत सहभाग घेतला. मार्गदर्शन नाशिकच्या पोलीस अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर यांचे लाभले.

# ... सरकारी ऑफिसही एजंटांसाठी आहे की काय?

## शिवाजीराव काकडे; जनशक्ती श्रमिक संघाच्यावतीने अन्याय मुक्ती आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : बांधकाम कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची शिष्यवृत्ती एक वर्षापासून मिळत नसल्यामुळे त्यांच्या शिक्षणाचे नुकसान होत आहे त्यांनी देखील बांधकाम कामगारच व्हावे, अशी सरकारची इच्छा आहे का? गरीब माणसांच्या टाळूवरचे लोणी खाणारे लोक म्हणजे एजंट होय, आता सरकारी ऑफिसही एजंटांसाठी आहे की काय? असा प्रश्न जनशक्ती श्रमिक संघाचे संस्थापक शिवाजीराव काकडे यांनी उपस्थित केला.

शेवगाव पाथर्डी येथील बांधकाम कामगारांच्या विविध मागण्यांसाठी कामगार आयुक्त कार्यालयावर जनशक्ती श्रमिक संघाच्या वतीने अन्याय मुक्ती आंदोलन करण्यात आले.

यावेळी संस्थापक शिवाजीराव काकडे, रामभाऊ पोटलोडे, संजय दुधाडे, भाऊसाहेब सातपुते, शिवाजी लांडे, देवदान अल्हाट, शंकर जाधव, अकबर शेख, राजेंद्र फलके, आबासाहेब काकडे, अशोक ढोकणे, यमुना खरपुडे, सुलभा उगले, मनोज घोंगडे, कांचन सागडे, बेबी सागडे, वैशाली सागडे, ज्योती आरे, यमुना घुले, नगीना शेख, समीना शेख आदी उपस्थित होते




निवेदनात म्हणले की, आठ ते नऊ महिन्यापासून शेकडो नविन बांधकाम कामगारांनी भरलेले अर्ज तसेच नुतणीकरणाचे पेडींग अर्ज मंजूर करावे. नवीन अर्ज मंजूर झालेल्या बांधकाम कामगारांना ओळखपत्र देवून त्यांना सुरक्षा संच व गृहपयोगी साहित्य संचाचे वाटप लवकर करावे. सन २०२४-२५ या वर्षाचे लाभाचे व शिष्यवृत्तीचे पेडींग अर्ज मंजूर करावे, लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्या कार्यकाळात बांधकाम कामगारांनी मोठ्या प्रमाणात नविन अर्ज व नुतणीकरनाचे अर्ज मोठ्या प्रमाणात ऑनलाइन भरण्यात आले होते.

शासनाच्या बांधकाम कामगार मंडळाच्या योजनेचा लाभ घेता येत नाही. त्यामुळे नुतणीकरणाचे प्रलंबित अर्ज तातडीने मंजूर करावेत , ज्या बाधकाम कामगारांचे अर्ज मंजूर आहेत व त्यांना ओळखपत्र मिळालेले नाहीत. अश्या सर्व अर्ज मंजूर झालेल्या बांधकाम कामगारांना लवकरात लवकर ओळखपत्र देण्याची व्यवस्था आपल्या कार्यालयाकडून करण्यात यावी. सन २०२४-२५ या वर्षामध्ये नोंदीत बांधकाम कामगारांनी त्यांच्या पाल्याच्या शिष्यवृत्तीचे अर्ज मोठ्या संख्येने भरलेले आहेत. असा विविध मागण्या संदर्भात सकारात्मक विचार करून तातडीने सर्व मागण्या मंजूर कराव्यात याव्या, अशी मागणी कामगार आयुक्त यांच्याकडे निवेदनातून करण्यात आली

# दिव्यांग विद्यार्थ्यांना दिले शालेय साहित्य

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव** : दिव्यांगांची सेवा हीच खरी जनसेवा व ईश्वर सेवा म्हणावी लागेल.अपंग सामाजिक विकास संस्था व आसान दिव्यांग संघटनेच्या माध्यमातून दिव्यांगांसाठी सातत्यपूर्ण गेल्या २५ वर्षापासून प्रयत्न करणारे संजय साळवे यांच्यामुळे श्रीरामपूर तालुक्यातील दिव्यांग बांधवांच्या समस्या ९९% मार्गी लागलेल्या आहेत.दिव्यांगानी न्यूनगंड न बाळगता सकारात्मक दृष्टिकोन बाळगणे गरजेचे आहे.महाराष्ट्रातील श्रीरामपूर तालुका हा दिव्यांगांसाठी पथदर्शी प्रकल्प ठरत आहे.असे प्रतिपादन दै.जयबाबाचे संपादक बाळासाहेब आगे यांनी ना. राधाकृष्णजी विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी केले.



श्रीरामपूर शहरातील सामाजिक जाणीव असणारे निलेश शिंदे यांनी स्वखर्चाने दिव्यांग बांधवांना शैक्षणिक साहित्य वाटून शैक्षणिक प्रगतीकडे वाटचाल करण्यासाठी दिव्यांगांना सहाय्य केले आहे. संजय साळवे सातत्यपूर्ण अनेक वर्षापासून दिव्यांगांसाठी विशेष उपक्रम राबवत आहे. दिव्यांगा करिता ते देव आहेत व आमच्यासाठी सुद्धा.मा.ना. राधाकृष्णजी विखे पाटील यांच्या विशेष सहकार्यातून भविष्यात नगरपालिकेच्या माध्यमातून दिव्यांगांसाठी विशेष घरकुल योजना राबविली जाईल.असे प्रतिपादन माजी नगरसेवक रवी अण्णा पाटील यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरून केले.

निलेश शिंदे यांनी स्वखर्चाने दिव्यांग बांधवांना शैक्षणिक साहित्य वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमासाठी अपंग सामाजिक विकास संस्थेचे चेअरमन संजय साळवे,सचिव वर्षा गायकवाड, आसान दिव्यांग संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मुस्ताकभाई तांबोळी,खजिनदार सौ. साधना चुडीवाल जिल्हाध्यक्ष विश्वास काळे,राज्य समन्वयक विनोद कांबळे सर,भारत मुक्ती मोर्चाचे सुधाकर बागुल यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुस्ताक भाई तांबोळी यांनी केले तर आभार वर्षा गायकवाड यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शांतुभाऊ मावरे,दिनेश पवार, सतीश साळवे,फिरोज शेख, सागर म्हस्के यांनी विशेष प्रयत्न केले.

# ‘मशिदींवरील भोंगे काढण्यासाठी उपोषण’

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर जिल्ह्यात सुरु असलेले गोवंशीय जनावरांचे अवैध कत्तलखाने बंद करून बंद करावेत तसेच सर्व मशिदींवरील भोंगे तात्काळ काढून टाकावेत यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले आहे. उपोषणात कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट, मढीचे सरपंच संजय मरकड, कालिदास महाराज घोडके, सुंदरनाथ महाराज, कानिफनाथ आखाडा, सुथबीरनाथ महाराज, सुखवीरनाथ महाराज, सोपाननाथ महाराज, सोमनाथ महाराज, मच्छिंद्र वेताळ, रमेश मरकड हे उपोषणाला बसले आहेत.

सरपंच मरकड म्हणाले की, दि. ७ मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देवून जिल्ह्यात सुरु असलेले गोवंशीय जनावरांचे अवैध कत्तलखाने बंद करून उदध्वस्त करावेत. तसेच सर्व मशिदींवरील भोंगे तात्काळ काढून टाकावेत, अशी मागणी केली होती. त्यावेळी ही आंदोलनाचा इशारा दिला होता परंतु, प्रशासनाने १० दिवसांत कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर १६ मे व २ जून रोजी पुन्हा स्मरणपत्रे दिली. परंतु त्यावर आजतागायत कुठलीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

हिंदु समाजाच्या आराध्य दैवत असणाऱ्या गोमातेची सर्रासपणे कत्तल जिल्ह्यातील विविध ठिकाणी अवैधपणे चालु असुन त्यांच्यावर कारवाई करून ती कायम स्वरुपी बंद करून जमिनदोस्त करण्यात यावी, अशी आमची मागणी आहे. उपोषणाला कृणाल भंडारी, अक्षय शिंदे, साहिल पवार, राहुल म्हेत्रे, चंद्रकांत जाधव, हिंदुराष्ट्र सेनेचे संजय आडोळे, सुकळीचे सरपंच लहू भवर, उपसरपंच संदीपराव गालफडे, सरपंच अंबादास ढाकणे आदींसह अनेक हिंदुत्ववादी नेत्यांनी भेट दिली आहे.

# अकोल्यातील अवैध दारूचे धंदे बंद करा

## तहसीलदार मोरे यांचे पोलीसांसह उत्पादन शुल्क विभागाला आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : आ. डॉ. किरण लहामटे यांनी अवैध दारु बंदीबाबत बैठका घेवूनही तालुक्यातील तब्बल २० गावांमध्ये अवैध दारुचे धंदे सुरूच आहे. ते अवैध दारू तत्काळ बंद करुन विक्रेत्यांविरुद्ध कारवाई करा, असे आदेश तहसीलदार सिद्धार्थ मोरे व राज्य उत्पादन शुल्कच्या अधिकाऱ्यांना दिले.

त्याअनुषंगाने अकोले तालुका दारुबंदी समितीच्या बैठकीत अकोले, राजूर पोलिस कारवाई करा, असे आदेश पोलीस व संगमनेर उत्पादन शुल्क विभागाला, तहसीलदार सिद्धार्थ मोरे यांनी आदेश दिले.



यावेळी उत्पादन शुल्कचे अधिकारी एम. के. सहस्त्रबुद्धे, गटविकास अधिकारी अमर माने, अकोलेचे पोलिस निरीक्षक मोहन बोरसे, राजूरचे सहाय्यक पोलिस निरीक्षक दीपक सरोदे व अशासकीय सदस्य हेरंब कुलकर्णी उपस्थित होते. अकोले तालुक्यातील ११२ ग्रामपंचायतींनी ग्राम रक्षक दल स्थापण्याचे प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकारी यांना सादर करण्यात आले आहेत. त्यांची परवानगी येताच, ११२ गावांमध्ये ग्रामरक्षक दल स्थापन करण्यात येईल, अशी माहिती तहसीलदार मोरे यांनी तालुका दारुबंदी समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिली.

# ना. विखेंचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

## प्रवरेच्या श्री रामेश्वर विद्यालयात नवागतांचे स्वागत; ग्रामस्थांच्या सहकार्यातून स्वच्छता व वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : प्रवरेच्या श्री रामेश्वर विद्यालय येथे संस्थेचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम म्हणून साजरा करण्यात आला. ग्रामस्थांच्या सहकार्यातून परिसर स्वच्छता,वृक्षारोपण आणि प्रवेशोत्सव आदी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्यकर्ते नारायण कहार, स्थानिक स्कूल कमिटीचे सदस्य बाजीराव खेमनर, बाबासाहेब लोहाळे, रामनाथ ढमक, मुख्याध्यापक डॉ. अनिल लोखंडे आदीसह शिक्षक, शिक्षकेत्तर वृंद, विदयार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




याप्रसंगी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयामध्ये सामाजिक उपक्रम एक पेड माता के नाम उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना वृक्षांचे, पर्यावरण महत्व समजावुन देत त्या वृक्षांची जपणुकीची जबाबदारी देऊन या वृक्षांचे मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

### विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून मिठाईचे वाटप

सर्व नवोदित विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देवून मिठाईचे वाटप करून स्वागत करण्यात आले. तसेच शासनातर्फे देण्यात आलेल्या मोफत पाठयपुस्तकांचे वितरण आणि ग्रामस्थ, तरुण वर्ग व गावातील मान्यवरांच्या देणगीतून विद्यालयास देण्यात आलेल्या वह्या व शालेय साहित्यांचे वितरण विद्यार्थ्यांना करण्यात आले.

# सामनगावातील अवैध दारु विक्री बंद करा

## ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांची पोलीस निरीक्षकांना निवेदनाद्वारे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : सामनगाव येथे सुरु असलेली अवैध दारु त्वरीत बंद करावी, अशी मागणी ग्रामपंचायतच्या वतीने पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्याकडे निवेदनाव्दारे केली आहे. यावेळी सरपंच आदिनाथ कापरे, उपसरपंच प्रमोद कांबळे यासह आदी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.




शेवगाव मुख्य राज्यमार्गावर तसेच विद्यालयासमोर अवैध दारु विक्री खुलेआम सुरु असल्याने गावातील अनेक तरुण मुले या व्यसनाच्या आहारी गेले आहेत. त्यातून अनेकांचे संसार उदध्वस्त झाले आहेत. आता शाळकरी मुले देखील व्यसनाधीन बनल्याने रोज छोटे मोठे वाद होत आहेत. याबाबत पोलीस प्रशासनाने वेळीच दखल घेऊन खुलेआम सुरु असलेल्या अवैध दारु विक्रीचा बंदोबस्त करावा, अशी मागणी निवेदनाव्दारे केली आहे.

### तांदुळ व इतर साहित्याची चोरी

दरम्यान, काल काही टारगटांनी गावातील प्राथमिक शाळेमध्ये लावलेले वृक्ष व इतर साहित्यांची मोडतोड केली. तर सारपे वस्तीवरील प्राथमिक शाळेतील खोलीचे कुलूप तोडून तांदुळ व इतर साहित्याची चोरी केली. विद्यार्थ्यांनी वर्षभर पाणी घालून वाढवलेल्या झाडांची कत्तल केल्याने पालकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे. दि. १६ रोजी पहिल्याच दिवशी मुलांना व शिक्षकांना हा प्रकार पहायला मिळाला. याबाबत ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने शेवगाव पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दाखल केली असून या प्रकाराची चौकशी करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# निवृत्तीनाथ पायी पालखी दिंडीचे लोणीत स्वागत

## पालकमंत्री ना. विखे पाटील यांच्या पुढाकारातून पायी वारीसाठी उत्कृष्ट नियोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : मुखी हरीनामाचा जयघोष ...आणि लाडक्या विठूरायांची मनी असलेल्या भक्तांचा महामेळा अर्थात विश्वगुरु श्री निवृत्तीनाथ पायी पालखी दिंडीचे बुधवारी सहकारी पंढरी लोणी आगमन झाले. जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वतीने वरद विनायक सेवाधामचे मठाधिपती महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, रणरागिनी



महिला मंडळाच्या अध्यक्षा धनश्रीताई विखे पाटील यांनी पालखीचे स्वागत करून भाविकांशी संवाद साधला. ग्रामस्थांच्या वतीने यावेळी भाविकांना महाप्रसादाचे वितरणही करण्यात आले.

यावर्षी जिल्ह्यात येणाऱ्या दिंड्यांसाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्याबरोबरच जिल्ह्यात आल्यानंतर उत्कृष्ट नियोजन असल्याची प्रतिक्रिया श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर पायी दिंडी सोहळ्याचे पायी दिंडी पालखी प्रमुख ह.भ.प नवनाथ महाराज गांगुर्डे यांनी व्यक्त केली मजल दरमजल करत श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर या ठिकाणाहून पंढरपूरकडे निघालेली विठूरायाच्या दिंडीचे लोणी या ठिकाणी भक्तीमय वातावरण स्वागत करण्यात आले. जवळपास ५५ दिंड्या आणि पन्नास हजार भाविकांचा लवाजमा सोबत विठ्ठलाचे भजन... टाळ मृदुंग गजर ...कपाळी केशरी गंध ...देवा तुझा मला छंद...भगवी पताका असा हा भक्तीचा सागर सकाळी दाखल झाला आणि संपुर्ण लोणी-राजुरी हा रस्ता हरीनामाने भक्तीमय झाााला. हरिनामाच्या जयघोषात भक्तिमय झाला. पालखी सोहळा प्रमुख नवनाथ महाराज गांगर्डे, नारायण महाराज मुढाल, जयंत महाराज गोसावी, मोहन महाराज बेलापूरकर, बाळकृष्ण महाराज डावरे यांचा समावेश आहे. यावेळी यावेळी ह.भ.प भरत महाराज धावणे, किसन विखे, कल्पना मैड, गणेश विखे, बाळासाहेब विखे, अशोक धावणे,दादासाहेब म्हस्के, प्रवीण विखे, भाऊसाहेब विखे, एन. डी. विखे, अनिल विखे, राहुल धावणे आदी उपस्थित होते.

### पालखी मार्ग व्हावा: गांगुर्डे महाराज

निवृत्ती महाराज पायी दिंडी सोहळ्याच्या पाठीशी आजपर्यंत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे भक्कमपणे उभे राहिले आहेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या मंत्रिमंडळाने भाविकांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहे. या निर्णयामुळे भाविकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. अहिल्यानगर मध्ये दिंड्यांसाठी विशेष सुविधा मंत्री विखे पाटील यांनी दिल्याने यावर्षीचा दिंडी सोहळा हा अधिक सुखकर झाला आहे श्री क्षेत्र त्रंबकेश्वर ते श्री क्षेत्र पंढरपूर हा मार्ग पालखी मार्ग व्हावा, अशी अपेक्षाही यावेळी पालखी प्रमुख नवनाथ महाराज गांगुर्डे यांनी व्यक्त केली

# विद्यार्थ्यांच्या भविष्यकाळासाठी काळजी घ्यावी

## रणजीत श्रीगोड; सोमैय्या विद्यालयात पाठ्यपुस्तकांचे वाटप



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : प्राथमिक शिक्षण उत्कृष्ट मिळाल्यास व शिक्षक आणि पालक जागृत राहिल्यास विद्यार्थ्यांचा भविष्यकाळ हा उज्वल झाल्याशिवाय राहत नाही, त्यासाठी विद्यार्थ्यांनी पाचवीपासूनच शैक्षणिक शिक्षणाचा पाया भक्कम केला पाहिजेत, असे प्रतिपादन क. जे. सोमौया हायस्कूलचे चेअरमन रणजीत श्रीगोड यांनी केले. सन २०२५ २६ या शैक्षणिक वर्षाकरिता पाचवी मध्ये प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ व पाठ्यपुस्तके वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कुलथे शालेय समितीचे सदस्य किशोर फुणगे, अरुण धर्माधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक भूषण गोपाळे, ज्युनिअर कॉलेजचे प्रशासनाधिकारी बी. एस. कांबळे, पर्यवेक्षक कल्याण लकडे, शंभूक वस्तीगहाचे अधीक्षक अशोक दिवे उपस्थित होते. श्रीगोड म्हणाले, हल्लीच्या काळात शैक्षणिक शिक्षण हे अति महत्त्वाचे झाले आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच संगणकीय ज्ञान हे आत्मसात केले पाहिजे.

येणारा काळ हा बुद्धिमत्तेचा आहे आपला भविष्यकाळ उज्वल करायचा असेल तर विद्यार्थ्यांनी पाचवीपासूनच आपला पाया हा भक्कम केला पाहिजे. याप्रसंगी पाचवी ते नववी मधील विद्यार्थ्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक पाठ्यपुस्तके व भेटवस्तू देण्यात आली. या उत्कृष्ट उपक्रमाचे परिसरातील शिक्षण प्रेमी नागरिकांनी कौतुक केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश धोंडलकर यांनी केले तर आभार स्मिता पुजारी यांनी मानले. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे ग्रंथपाल अशोक खैरे, श्रीराम कुलकर्णी, अनिल चोभे, सुरेंद्र पाटील, विनायक चितळकर, उर्मिला कासार, शरयू यरगट्टीकर, रूपाली केवल यांच्यासह विद्यालयातील सर्व अध्यापक व शिक्षक वृंद यांनी परिश्रम घेतले.

# आमदार लंघे यांची केली शेरणीतुला

## पानेगाव येथील जंगले कुटुंबाची केली नवसपूर्ती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पानेगांव** : पानेगांव येथे जंगले कुटुंबाच्या वतीने नेवासा तालुक्याचे नवनिर्वाचित आमदार विठ्ठलराव लंघे यांची पानेगांव मांजरी येथील असलेले ग्रामदैवत चंद्रागिरी महाराजांच्या दरबारात शेरणी तुला अर्जुन पाराजी जंगले व उषा अर्जुन जंगले यांचा कुटुंबाच्या वतीने करण्यात आला. आमदार विठ्ठलराव लंघे यांचे पानेगांव येथे आगमन होताचं फटाक्यांच्या आताषबाजीने स्वागत करुन छत्रपती



शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला श्रीफळ वाढवून गावातील कार्यकर्त्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच पदाधिकारी यांनी हि सन्मान केला यावेळी लोकनियुक्त सरपंच निकीता भोसले- आंबेकर डॉ. जयवंतराव गुडधे, मार्केट कमीटीचे माजी संचालक जालिंदर जंगले, दत्तात्रय पोटे, शिरेगांवचे माजी सरपंच किरण जाधव, लक्ष्मण माकोणे, सागर आंबेकर, रमेश गणगे, पाराजी गुडधे, सतिश जंगले, जालिंदर जंगले, विजय जंगले, रविंद्र सोनवणे सुरेंद्र जंगले शेतकरी संघटनेचे अशोक काळे, अच्युत जंगले, ग्रामविकास अधिकारी गणेश पाखरे,बबनराव जंगले आदींसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# प्रवेशोत्सवाने नवागतांचे जल्लोषात स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात नवीन वर्षाची सुरुवात नवागतांचे स्वागत, मोफत पाठ्यपुस्तक वाटप व गुणवंत विद्यार्थी सत्कार अशा त्रिवेणी कार्यक्रमाने करण्यात आली. सर्वप्रथम कर्मवीर अण्णा यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून वंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्थानिक स्कूल कमिटीचे ज्येष्ठ सदस्य सुधीर कासार यांनी स्वीकारले. विद्यालयाचे मुख्याध्यापक



माळी डी. एन., यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी उद्धवराव पवार उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते नवागतांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. तसेच इयत्ता पाचवी ते आठवीतील सर्व उपस्थित विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक बाळासाहेब कसार, शितल निंभोरे, स्वेजल रसाळ, संतोष नेहूल, उषा नाईक आदी उपस्थित होते.

# आज श्रीरामपुरात दिंडीचे आगमन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्री क्षेत्र त्रंबकेश्वर (जि. नासिक) येथील संत श्रेष्ठ निवृत्ती महाराज संस्थांनच्या वतीने आषाढी एकादशीस पंढरपुरला जाणाऱ्या निवृत्तीनाथांच्या पालखी व दिंडीचे श्रीरामपूर नगरीमध्ये गुरूवार, दि. १९ जून रोजी दुपारी १२.३० वाजता आगमण होणार आहे. श्रीरामपूर-संगमनेर रस्त्यावरील जुन्या जकात नाक्याजवळ मान्यवरांचे उपस्थितीत पालखीचे स्वागत करण्यांत येणार आहे. संत निवृत्तीनाथ महाराज पालखी व दिंडीचे नेतृत्व, पालखीचे मानकरी जयंत महाराज गोसावी, बाळकृष्ण महाराज डावरे, मोहन महाराज बेलापुरकर, बाळासाहेब देहुकर, महामंडलेश्वर, रामकृष्ण महाराज लहवीतकर, सुरेश महाराज गोसावी, अध्यक्ष त्र्यंबकराव गायकवाड व मंदिराचे विश्वस्त करीत आहेत. पालखीच्या स्वागतासाठी खा. भाऊसाहेब वाकचौरे, आमदार हेमंतराव ओगले, माजी आ. भाऊसाहेब कांबळे, माजी आमदार भानुदास मुरकुटे, माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे, युवा नेते सिध्दार्थ मुरकुटे, संजय फंड, प्रातांधिकारी किरण पाटील, तहसिलदार मिलिंद वाघ, अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलबुर्मे, बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, सचिन गुजर, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष गौतम उपाध्ये, उपाध्यक्ष निलेश बोरावके, सचिव संदीप अग'वाल, सहसचिव योगेश ओझा, सर्व सदस्य, नगरसेवक, मु'याधिकारी मच्छिंद्र घोलप, राजकीय पक्षाचे अध्यक्ष, प्रमुख कार्यकर्ते, माजी नगरसेवक आदी स्वागतासाठी उपस्थित राहणार आहेत.

# जिल्ह्यातील शिक्षण विभागाने घेतली उत्तुंग भरारी

## शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राबविले अनेक उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : चांगले काम केले तर त्या कामाची दखल घेतली जाते. तसेच जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी तीन वर्षे अनेक विधायक कामे केलेली आहेत. त्या कामामुळे त्यांना एक वर्षांची मुदत वाढ देण्यात आलेली आहे. आगामी वर्षात शिक्षणाधिकारी म्हणून तेच काम करणार आहेत. जिल्हा परिषदेत गेल्या तीन वर्षांपासून प्रशासक राज आहे. या राज काळात जिल्हा परिषदेच्या कारभारावर सर्वच स्थरातून टीका-टिप्पन्नी झालेली आहे. परंतु प्राथमिक शिक्षण विभागाच्या कारभावर अद्याप टीका-टिप्पन्नी झालेली नाही. विशेष म्हणजे तीन वर्षात शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी शाळांचा गुणवत्ता आलेख उंचावण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. हा प्रयत्न करताना त्यांनी विविध उपक्रम राबविलेले आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेचा गुणवत्तेबरोबर सर्वच बाबीत विकास झालेला दिसून येत आहे. जिल्ह्यातील शाळांमध्ये त्यांनी विविध बदल घडवून आणले आहेत. तसेच शिक्षकांनाही त्यांनी शिस्त लावण्याचे काम केलेले आहे. कारवाईचा बडगा उगारून नव्हे तर त्यांच्या चुका लक्षात आणून देऊन कामकाज केले आहे. त्यामुळे शिक्षकांचे आवडते अधिकारी झालेले आहेत. त्यामुळे शिक्षक व शिक्षणाधिकारी यांच्यात गेल्या तीन वर्षात संघर्ष झालेला नसून एकजुटीने सध्या प्राथमिक शिक्षण विभागाचे कामकाज सुरु आहे.

पाटील यांना एक वर्षांची मुदतवाढ मिळाल्यापासून आजपर्यंत जिल्ह्यातील शिक्षक त्यांचे भेट घेऊन अभिनंदन करीत आहेत. शिक्षण विभागामार्फत वर्ष २०२३ ते २५ मध्ये राबविलेले उल्लेखनीय उपक्रमक्षेत्रीय अधिकाऱ्यांच्या गुणवत्ता विकास कार्यशाळा, शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी १३ जून २०२३, २८ डिसेंबर २०२३ रोजी व दि.०३ सप्टेंबर २०२४ रोजी क्षेत्रीय अधिकायांची जिल्हास्तरीय कार्यशाळा घेतली आहे. त्याने गुणवता सनियंत्रणात सुसूत्रता आली. जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशवर्ष २०२४-२५ मध्ये जवाहर नवोदय विद्यालय प्रवेशासाठी जिल्हा परिषद शाळेतील ५७ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

मिशन आरंभमार्गदर्शक पुस्तिका वर्ष २०२३-२४ मध्ये इ.३ री व ४ थी साठी सेस निधीतून पुरविण्यात आलेल्या नवोदय व शिष्यवृत्ती पूर्वतयारी परीक्षा पुस्तिकेच्या वापराचे सनियंत्रण केल्याने शिष्यवृत्ती पूर्व तयारीसाठी दिशा मिळाली आहे. मिशन आरंभ जादा तासिका इ.३ री ते इ. ८ वी या वर्गातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेची पूर्वतयारी व्हावी यासाठी शालेय वेळेपूर्वी जादा तासिका शाळास्तरावर घेण्यात आल्या आहेत. त्याचा फायदा शिष्यवृत्ती परीक्षेच्या निकालात दिसून आला. सराव परीक्षा- शिष्यवृत्ती परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी इ. ३ री. ४ थी. ६ वी व ७ वीचे प्रत्येकी तीन सराव परीक्षा जिल्हास्तरावरुन घेतल्या आहेत. मिशन प्रारंभ परीक्षा शिष्यवृत्ती परीक्षेच्या पूर्व तयारीसाठी दि. १० मार्च २०२४ व दि. १६ मार्च २०२५ रोजी इ. ४ थी व ७ वी मधील विद्यार्थ्यांसाठी मिशन आरंभ परीक्षा जिल्हा परिषदेच्या सेस निधीतून आयोजित करण्यात आली. त्यामुळे स्पर्धा परीक्षामाठी विद्यार्थ्यांची तयारी होऊन त्यांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.

गतवर्षीच्या तुलनेत इ. ४ थी चा निकाल २३. ६७ टक्के व इ. ७ वी चा निकाल २५.५२ टक्क्याने वाढ झाली आहे. शिष्यवृत्ती परीक्षा शिक्षक कार्यशाळा शिष्यवृत्ती परीक्षा पूर्व तयारीसाठी शिक्षकांची जिल्हास्तरावरुन माहे ऑगस्ट २०२३ मध्ये ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली आहे. तसेच मार्च २०२४ मध्ये सर्व तालुकास्तरावरुन कार्यशाळा घेण्यात आल्या. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी १०० टक्के विद्यार्थी प्रविष्ठ शिष्यवृत्ती परीक्षेसाठी जि. प. शाळेतील इ. ५ वी व इ. ८ वी चे १०० टक्के विद्यार्थी प्रविष्ठ झाले आहेत. त्याने सर्व विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ठ होण्याची संधी मिळाली आहे. सेस निधीतून शिष्यवृत्ती परीक्षा फी इ. ५ वी व ८ वी च्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षा शुल्क व शाळा संलग्रता शुल्क सेस फंडातून तरतूद करण्यात आली होती. या उपक्रमाचा फायदा विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी फायदा झाला आहे. प्रज्ञावान विद्यार्थी मार्गदर्शन राज्य गुणवत्ता यादीत अहमदनगर जिल्हयातील जास्तीत जास्त विद्यार्थी यावेत, यासाठी मिशन आरंभ मधील जिल्हा गुणवत्ता यादीतील इयत्ता ५ वी व ८ वी च्या प्रत्येकी ५०० विद्यार्थ्यांसाठी वर्षभर ऑनलाईन तासिका घेण्यात आल्या.सराव परीक्षावर्ष २०२४-२५ मध्ये विद्यार्थ्यांच्या सरावासाठी तालुकास्तरावरुन प्रश्नसंच निर्मिती करुन घेऊन इ.५ वी व ८ वी प्रत्येकी ११ सराव परीक्षा यापैकी इ.५ वी व ८ वी च्या ५ सराव चाचण्या जि.प.सेस निधीतून मुख्य शिष्यवृत्ती परीक्षेप्रमाणे केंद्रनिर्मिती करुन घेण्यात आली.

त्यामुळे विद्यार्थ्यांची परीक्षेची भिती कमी झाली. त्यामुळे जिल्हा परिषद शाळांचा फेब्रुवारी २०२५ च्या परीक्षेत इ.५ वी चा निकाल ६.५४% व इ.८ वी चा निकाल ६.२४% ने वाढला असून गतवर्षीच्या तुलनेत १०६६ विद्यार्थी जास्तर पात्र झाले आहेत. ०% निकालाच्या ७९ शाळा कमी झाल्या आहेत. इस्त्रो शैक्षणिक सहलः १६ ते २० डिसेंबर २०२४ या कालावधीत इ. ५ वी ते ८ वी च्या ४२ विद्यार्थ्यांसाठी इस्त्रो (डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटर, भुंबा, केरळ) शैक्षणिक सहलीचे आयोजन जि. प. सेस निधीतून केले होते. ओपन सायन्स पार्क : अहिल्यानगर जिल्हयातील ५ शाळांमध्ये जि. प. सेस निधी व लोकसहभाग / ग्रामपंचायत निधीतून ओपन सायन्स पार्क कार्यान्वित केले आहे. मिशन आपुलकी : अहिल्यानगर जिल्हयात जिल्हा परिषदेच्या ३५३४ शाळा असून शासन व जिल्हा परिषद स्तरावरून या शाळांना भौतिक सुविधा पुरविण्याचे काम सातत्याने सुरु आहे. त्यानुषंगाने शाळेचे माजी विद्यार्थी, गावातील प्रतिष्ठीत, दानशूर नागरिक, सेवाभावी संस्था, परिसरात असणा-या औद्यागिक कंपन्या इ. मिशन आपुलकी अंतर्गत लोकसहभागाचे आवाहन करण्यात आले आहे.



सदर उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळत असून माहे मे २०२५ अखेर रक्कम रु. ५७.०० कोटी लोकसहभागातून शाळा खोल्या, रंगकाम, वर्गखोल्या दुरुस्ती, स्वच्छतागृहे, जलशुध्दीकरण यंत्र, इन्व्हर्टर, शालेय साहित्य, संगणक, प्रिंटर, एल.ई.डी., टॅबलेट, इंटरॲक्टिव बोर्ड, ग्रंथालयासाठी पुस्तके इ सुविधा प्राप्त झाल्या आहेत. आधार व अपार आयडी : वर्ष २०२४-२५ मध्ये जिल्हा परिषद शाळेतील ९८.४८ टक्के विद्यार्थ्यांचे आधार कामकाज झाले असून ९४.२८ टक्के विद्याव्यांचे अपार आयडी जनरेट झाले आहे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना : अहिल्यानगर जिल्हयात प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेस एकुण ४५४१ असून ४४४१ शाळांमध्ये परसबाग आहेत. पदोन्नती : मुख्याध्यापक पदोन्नती ११ फेब्रुवारी २०२२ रोजी मराठी माध्यमाच्या १६९ कर्मचाऱ्यांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे.

१९ जून २०२३ रोजी उर्दू माध्यमाच्या ६ व मराठी माध्यमाच्या १८९ कर्मचाऱ्यांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नती पदस्थापना देण्यात आली आहे. ऑगस्ट २०२३ मध्ये मराठी माध्यमाच्या ०२ कर्मचायांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे. १३ मार्च २०२४ रोजी मराठी माध्यम ाच्या ८७ कर्मचात्यांना मुख्याध्यापक पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे. २० ऑगस्ट २०२४ रोजी मराठी माध्यमाच्या ८९ कर्मचात्यांना मुख्याध्यापक पदावर पदोनतीने पदस्थापना देण्यात आली आहे.

केंद्रप्रमुख पदोनती दि.२० नोव्हेंबर २०२३ रोजी ८९ कर्मचायांना केंद्रप्रमुख पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे. विस्तार अधिकारी पदोन्नती : १९ जून २०२३ रोजी १२ कर्मचायांना विस्तार अधिकारी वर्ग ३ वेणी २ मराठी माध्यम व २३ कर्मचाऱ्यांना विस्तार अधिकारी वर्ग ३ श्रेणी ३ मराठी माध्यम पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे. प्रतिक्षा यादीतून दि. ३१/०८/२०२३ रोजी ३ कर्मचात्यांना विस्तार अधिकारी वर्ग ३ श्रेणी २ मराठी माध्यम व ७ कर्मचान्यांना विस्तार अधिकारी वर्ग ३ श्रेणी ३ मराठी माध्यम पदावर पदोन्नतीने पदस्थापना दिली आहे. १० जानेवारी २०२४ रोजी १ कर्मचाऱ्यास उर्दू माध्यमासाठी विस्तार अधिकारी वर्ग ३ श्रेणी ३ या पदावर पदोन्नती दिली आहे. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी ५ कर्मचाऱ्यांना विस्तार अधिकारी वर्ग ३ श्रेणी २ मराठी माध्यम व ६ कर्मचान्यांना विस्तार अधिकारी वर्ग ३ श्रेणी ३ मराठी माध्यम या पदावर पदोश्रती दिली आहे. २० ऑगस्ट २०२४ रोजी १३ कर्मचाऱ्यांना विस्तार अधिकारी वर्ग ३ श्रेणी ३ मराठी माध्यम या पदावर पदोन्नती दिली आहे. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा : वर्ष २०२३-२४ मध्ये सदर उपक्रमात अहिल्यानगर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथ. शाळा, संवत्सर ता. कोपरगाव या शाळेने विभागस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला आहे. तसेच प्रवरा कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, लोणी ता. राहाता या शाळेने विभागस्तरावर प्रथम क्रमांक मिळविला आहे. वर्ष २०२४-२५ मध्ये जिल्हा परिषद प्राथ. शाळा, संवत्सर ता. कोपरगाव या शाळेने विभागस्तरावर प्रथम क्रमांक मिळविला आहे. तसेच सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय, कृषी विद्यापीठ ता. राहुरी या शाळेने विभागस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला आहे. विविध गुणर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा, केंद्र, तालुका व जिल्हा पातळीवर विविध गुणर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम स्पर्धा घेतल्या आहेत. जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा विद्यार्थ्यांच्या शारीरिक विकासासाठी शाळा, केंद्र, तालुका व जिल्हा पातळीवर जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये ९०० विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर सहभाग नोंदवला. दि.२७ व २८ फेब्रुवारी २०२४ रोजी जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा दा.ह. घाडगे पाटील विद्यालय, त्रिमुर्ती नगर, नेवासा येथे घेण्यात आल्या. तसेच फेब्रुवारी २०२५ मध्ये जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा दा.ह. घाडगे पाटील विद्यालय, त्रिमुर्ती नगर, नेवासा येथे घेण्यात आल्या.

डिजीटल शाळा : अहिल्यानगर जिल्ह्यातील एकूण ३५४५ जिल्हा परिषद शाळांपैकी २२९० जिल्हा परिषद शाळा डिजिटल शाळा झालेल्या आहेत. यातील १५ वा वित्त आयोगातून १०४० तर, मा. खासदार यांचा निधी, मा. आमदार यांचा निधी, मिशन आपुलकी द्वारे जिल्ह्यात १२५० डिजिटल शाळा साकारलेल्या आहेत. ग्रंथालय रोटरी क्लब व ग्लोबल नगरी समुहामार्फत वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण १४५ शाळांना ग्रंथालयाचे वितरण करण्यात आले आहे. वर्ष २०२४-२५ मध्ये रोटरी क्लब मार्फत ५० शाळांना ग्रंथालय वितरण करण्यात आले आहे.



### सोशल मीडियाचा केला वापर

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाबाबतची माहिती, सूचना, उपक्रम सर्वापर्यंत पोहाचवण्यासाठी सोशल मिडीयाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. त्यांअंतर्गत सोशल मिडीया प्लॅटफॉर्मचा अधिकृत वापर फेब्रुवारी २०२३ पासून सुरु केला आहे. शिक्षण विभागाचे संकेतस्थळ, युट्यूब वाहिनी, ब्लॉग, फेसबुक पेज, इंस्टाग्राम व एक्स अकाऊंट सुरु करण्यात आले आहे. संकेतस्थळावर अहमदनगर जिल्हा परिषदेच्या शिक्षकांनी विकसित केलेल्या स्वाध्याय पुस्तिका, नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी सराव प्रश्नपत्रिका, शिष्यवृत्ती ऑनलाईन टेस्ट, उपक्रमाचे १ ते ८४ भागाचे ऑडिओ, आय.सी.टी. अंतर्गत उपक्रम, शिष्यवृत्ती मार्गदर्शक व्हीडीओ, शैक्षणिक दिशादर्शिका, शासन निर्णय व परिपत्रके इ. परीक्षांच्या सराव प्रश्नपत्रिका, विविध उपयुक्त शासकीय वेबसाईटची माहिती, शिक्षण विभागाच्या विविध माहित्यांची १ ते ३३ प्रपत्रे इ. माहिती उपलब्ध आहे. स्मार्ट पीडीएफद्वारे एका क्लिकद्वारे सर्व शाळांची माहिती उपलब्ध आहे. तसेच टेलिग्राम ग्रपद्वारे जिल्हयातील सर्व शिक्षक जोडले गेले आहेत.

# ड्रेस खरेदी करताना...

उन्हाळा असो वा पावसाळा शॉर्ट ड्रेस जास्त आरामदायक वाटतात. आजकाल शर्ट ड्रेसचाही ट्रेंड आहे. तरूण मुली असो वा महिला सर्वांनाच शर्ट ड्रेस भुरळ घालतात. पार्टी, पिकनिकला जाताना शर्ट ड्रेस वापरणं जास्त सोयीचं असतं. ऑफिसमध्ये फॉर्मल शर्ट ड्रेस चांगले वाटतात. बाजारात विविध स्टाईलचे शर्ट ड्रेस सहज मिळतात. स्टायलिश दिसण्यासाठी तुम्ही देखील एखादा छान शर्ट ड्रेस विकत घेण्याचा विचार करत असाल, तर काही बाबी माहीत असायला हव्या. कारण शर्ट ड्रेस तुम्ही कुठे घालणार आहात यावरून अनेक गोष्टी ठरू शकतात.



**ट्रेन्डी**

बॉडी टाईप : शर्ट ड्रेस खरेदी करताना बॉडी टाईप लक्षात घेऊन मगच खरेदी करायला हवी. बाजारात यासाठी विविध बॉडी टाईपनुसार शर्ट ड्रेस विकत मिळतात. थोडक्यात जर तुमचा बॉडी टाईप ॲपल शेप असेल तर तुम्ही शॉर्ट ड्रेस वापरू शकता. ज्यामुळे तुमचे पाय छान दिसतील. तसंच तुम्ही ओव्हर ग्लास बॉडी टाईपच्या असाल तर तुम्हाला डेनिम शर्ट ड्रेस जास्त छान दिसतील. कोणत्या ओकेजनसाठी: शर्ट ड्रेस तुम्ही कधी आणि कुठे वापरणार आहात हे लक्षात ठेवायला हवं. कारण असे ड्रेस तुम्ही ऑफिसमध्येही वापरू शकता आणि बाहेर फिरायला जाताना देखील वापरू शकता. ऑफिसला जाताना तुम्हाला फॉर्मल टाईपचे ड्रेस निवडावे लागतील. जे जास्त शॉर्ट नसतील. मात्र बाहेर फिरायला जाताना तुम्ही तुमच्या आवडीनुसार शॉर्ट शर्ट ड्रेस निवडू शकता.

# फॉलो द फ्लोरल ट्रेंड

मुलांच्या फॅशनमध्ये फ्लोरल प्रिंटला चांगलंच महत्त्व आलं आहे. फ्लोरल हा प्रकार आता गर्ली राहिलेला नाही. मात्र अनेकांना अजूनही फ्लोरल प्रिंट घालायची भिती वाटते किंवा फ्लोरल्स आपल्यावर शोभून दिसतील की नाही, असं त्यांना वाटत असतं. म्हणूनच फ्लोरल कॅरी करण्याच्या या काही स्मार्ट टिप्स...

✻ आकर्षक आणि ट्रेंडी लाल, पिवळ्या रंगाशिवाय फ्लोरलला काहीच अर्थ नाही. मध्यंतरी अपारशक्ती खुरानाने लाल रंगाचा फ्लोरल शर्ट आणि व्हाईट ट्राउझर असा लूक कॅरी केला होता. एखादा स्टेटमेंट शर्ट आणि सॉलिड पँट किती खुलून दिसू शकतो, याचं अपराक्षी उत्तम उदाहरण आहे.

**फॅशन पॅशन**

✻ विक्रांत मेस्सीने कॉटन आणि लिननचं कॉम्बिनेशन केलं होतं. फ्लोरल प्रिंटवाला क्रश्ड शर्ट आणि लिनन ट्राउझर हे कॉम्बिनेशन खूप सुंदर दिसतं.

✻ प्रिंट ऑन प्रिंट हा लूकही कॅरी करता येईल. अर्थात प्रिंट ऑन प्रिंट लूकसाठी थोड्या छोट्या चेरी ब्लॉसम प्रिंट्सची निवड करा. यामुळे प्रिंट ऑन प्रिंट लूक चांगलाच उठून दिसेल.



✻ एकाच पद्धतीचा सूट कॅरी करायचा कंटाळा आला असेल तर तुम्ही ब्लेझरच्या आत प्लेन शर्टऐवजी फ्लोरल प्रिंटवाला शर्ट घाला.

✻ बाजारात सध्या वेगवेगळ्या प्रकारच्या फ्लोरल प्रिंट्स पहायला मिळतात. भरगच्च फ्लोरल प्रिंटचा शर्ट घ्या. अशा प्रिंटचं जॅकेटही खूप शोभून दिसतं. या लूकमुळे तुम्ही खूपच स्मार्ट दिसू शकतो. त्यामुळे फ्लोरल्स अगदी बिनधास्त कॅरी करा.

आजकालची तरुणाई नोकरीपेक्षा व्यवसाय करण्याला प्राधान्य देते. त्यासाठी शिक्षण घेत असतानाच एकीकडे व्यवसायाच्या दृष्टीने उपयोगी असणाऱ्या बाबींकडेही लक्ष देण्याचा त्यांचा कल असतो. त्यामुळे पुढील काळात व्यवसाय अधिक यशस्वी होण्याच्या दृष्टीने मदत होते. कुल्हड चहाचा स्टॉल सुरू करण्याची एक आगळीवेगळी कल्पना घेऊन व्यवसायामध्ये उतरणाऱ्या उत्तम शर्माबद्दल जाणून घेऊ या!

# 'शर्मा जी की चाय'

पुण्यामध्ये कोथरूड भागातील मयूर कॉलनीमधील नाटककार पु.भा. भावे पथावर 'शर्माजी की चाय' नावाचा, ५ फूट बाय ५ फूट आकाराचा, फूटपाथच्या कडेला उभा असलेला, छोट्या आकाराचा चहाचा स्टॉल दिसतो. प्रत्येक चहाच्या स्टॉलची एक वेगळी खासियत असते. प्रत्येक जण आपापल्या मार्केटिंग स्ट्रॅटेजीनुसार व्यवसाय करत असतो. या स्टॉलवर २० रुपये किंमत असलेला चहा मातीच्या पेल्यामध्ये म्हणजेच कुल्हडमध्ये दिला जातो. त्यामुळे ग्राहक स्टॉलकडे आकर्षित होतात.

मुळचा माजलगावचा असलेला सत्यम पुरुषोत्तम शर्मा हा २४ वर्षांचा तरुण 'शर्मा जी की चाय'चा सर्वेसर्वा आहे. बी.बी.ए. चे शिक्षण पूर्ण करून आता एम.बी.ए. करत असलेला सत्यम उत्तम बिझनेसमन होण्याची स्वप्न बाळगतो आहे. चहा स्टॉलच्या रुपाने त्याने बिझनेसमध्ये प्रवेश केला. लहानपणापासून असलेली क्रिकेटची आवड २०१८ साली त्याला पुण्यात घेऊन आली. पुण्याच्या दिलीप वेंगसरकर क्रिकेट ॲकॅडमीमध्ये त्याने प्रवेश घेतला. त्यानंतर पदवीचे शिक्षण घेत असतानाच त्याला फूड इंडस्ट्रिशी संबंधित प्रॉजेक्ट मिळाला. त्याचवेळी स्वतःचा चहाचा स्टॉल टाकायचा विचार मनात येऊ लागला. पूर्वी उत्तर भारतामध्ये कुल्हडमध्येच चहा पिण्याची संस्कृती होती. त्याची मावशी त्या भागातली असल्यामुळे उत्तम आणि इतरांपेक्षा थोडा वेगळा चहा बनवायची. आपला चहा इतरांपेक्षा वेगळा असायला हवा या उद्देशाने त्याने ही कला मावशीकडून शिकून घेतली आणि चहाचा स्टॉल सुरू केला. आज तो यशस्वीरित्या स्टॉल सांभाळत आहे. त्याला दिवसाला साधारणपणे २५०० रुपयांचे भांडवल पुरते. पण रोजचा धंदा २५०० रुपये भांडवलाच्या चौपट म्हणजे १०,००० रुपये इतका होतो. अर्थात यासाठी त्याला खूप मेहेनत घ्यावी लागते. त्याचा स्टॉल सकाळी साडेसात ते रात्री अकरा वाजेपर्यंत म्हणजे जवळजवळ १४-१५ तास चालू असतो. एक मुलगा कामाला ठेवला असला तरी तो स्वतः दहा तास स्टॉलवर हजर असतो. आधी बरेच महिने प्रॉफिट होत नसले तरीही त्याने जिद्दीने स्टॉल चालू ठेवला. पदार्थांची क्वालिटी खालावणार नाही याची काळजी घेतली. आत्ताचे यश त्याला अनेक महिन्यांनी मिळाले. त्यातून त्याला धंद्यामधले 'पेशन्स' चे महत्त्व कळाले आहे, असे म्हणायला हरकत नाही.

**अचिव्हर**

त्याला आता स्वतःचे स्टार्ट अप सुरू करायचे असून एक कॉफीचा ब्रँड मार्केटमध्ये आणायचा आहे. या दृष्टीने त्याची तयारी सुरु आहे. बी.बी.ए. आणि एम.बी.ए. करायचा मुख्य उद्देश म्हणजे या कोर्सेसमधून मिळणाऱ्या ज्ञानाचा उपयोग करून चांगला धंदा करून उत्तम बिझनेसमन होण्यासाठी करायचा आहे. आजकाल बी.बी.ए. आणि एम.बी.ए. करणारे अनेक तरुण आणि तरुणी 'चांगली नोकरी मिळावी' हाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून असतात. या कोर्सेसच्या अवाढव्य फीचा एक छोटासा हिस्सा पालकांनी मुलांना दिला तर छोटासा का होईन एखादा उद्योग किंवा व्यवसाय सुरू करता येऊ शकतो. त्यासाठी पालकांनी प्रोत्साहन द्यावे लागेल, असे त्याचे मत आहे.




# टेस्टी पोटॅटो पास्ता

दोस्तांनो, तुम्हाला पास्ता आवडतो का? मग ही हंगेरियन डिश तुमच्यासाठी आहे. अगदी कमी घटकांचा वापर करून तुम्ही ही डिश बनवू शकता.

**सामग्री:** फ्लॅट पास्ता, २ बटाटे, एक चिरलेला कांदा, मिरपूड, लाल पॅपरिका, चवीनुसार मीठ आणि तेल.

**कृती:** पास्ता पाण्यात शिजवून घ्या. पास्ता शिजवण्याची कृती पाकिटावर दिलेली असते. बटाट्याची सालं काढून त्यांचे छोटे तुकडे करा. एका भांड्यात पाणी घ्या. गॅसवर ठेवा. पाणी उकळल्यावर त्यात बटाट्याचे तुकडे घाला. मऊ शिजू द्या. पाणी काढून टाका. आता हे बटाटे कुस्करून घ्या. कढईत थोड तेल घ्या. त्यात चिरलेला कांदा घालून दोन मिनिटं परता. आता यात कुस्करलेले बटाटे घाला. नीट हलवून घ्या. त्यात मिरपूड, मीठ आणि लाल पॅपरिका घाला. सर्व नीट शिजल्यावर कढईत पास्ता घाला. सगळं नीट मिक्स करा. गॅस बंद करा आणि गरमागरम पोटॅटो पास्ता खा.

**झटपट रेसिपी**




# 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' मध्ये करिअर

आजकाल सॉफ्टवेअर्स, विविध ॲप्लिकेशन्स तसंच उपकरणांमध्ये होत असलेला आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर पाहता या क्षेत्रामध्ये भविष्यात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होण्याची शक्यता आहे. ऑटोमेशन आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स एक्स्पर्ट्सना असलेली मागणी वेगाने वाढत आहे. ए.आय. मध्ये करिअर करायचं असेल, तर विज्ञान शाखेतून बारावीची परीक्षा देणे आणि त्यानंतर कम्प्युटर सायन्स किंवा इंजिनीअरिंग ग्रॅज्युएट असणे गरजेचे आहे. त्यानंतर आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी निगडित विविध क्षेत्रांत स्पेशलायझेशन करून त्यात एक्स्पर्ट होता येतं. आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्राशी निगडित प्रमुख कोर्सेस पुढीलप्रमाणे.

✻ फाउंडेशन ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग

✻ आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग या विषयात पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम

✻ फुल स्टॅक मशीन लर्निंग अँड आर्टिफिशियल इंटेलिजन्स प्रोग्राम



✻ आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डीप लर्निंग या विषयात पोस्ट ग्रॅज्युएट सर्टिफिकेट प्रोग्राम. आयआयटी कॉलेजेसमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्राशी निगडित कोर्सेस करता येतात. खरगपूर, दिल्ली, मुंबई, कानपूर, मद्रास, गुवाहाटी, रूरकी या शहरांतल्या आयआयटी कॉलेजेसमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी संबंधित कोर्सेस आहेत. त्याशिवाय बेंगळुरूतली इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, नवी दिल्लीतली नेताजी सुभाष इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बिट्स-पिलानी, बेंगळुरूतलं सेंटर फॉर आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड रोबॉटिक्स, अलाहाबादमधली इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, तसंच हैदराबाद विद्यापीठ या संस्थांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी निगडित कोर्सेस उपलब्ध आहेत. या क्षेत्रातील पदवीधर विद्यार्थ्याला मासिक ५०-६० हजारांपासून एक लाखापर्यंत वेतन मिळू शकतं. अनुभव आणि कौशल्यांच्या आधारे वेतन कमी-जास्त होऊ शकतं.

**वेगळ्या वाटा**




## शेर की जुबानी

जनाब मत पुछिये
हद हमारी गुस्ताखियों की,
हम आईना जमीं पर रखकर
आसमां कुचल दिया करते हैं।

दिल ने आज फिर तेरे
दीदार की ख्वाहिश रखी है
अगर फुरसत मिले तो ख्वाबो
में आ जाना

मंजिले क्या है, रास्ता क्या है...?
हौसला हो तो फासला क्या है...?

## स्मार्ट टिप्स

### अशी वाढवा जी मेलची स्पेस

प्रत्येक जी मेल खात्यात १५ जीबी स्टोरजची सुविधा दिलेली असते. मात्र ही स्पेस संपल्यावर चांगलीच पंचाईत होते. नव्या ई मेल्स पाठवणं कठीण होतं. इनबॉक्समध्ये नव्या मेल्स येत नाहीत. मग अशावेळी काय करायचं, स्पेस कशी वाढवायची... यासाठी तुम्हाला जीमेल खातं ओपन करावं लागेल. यानंतर सर्च बारमध्ये जाऊन अटॅचमेंट लार्जर १० एम टाईप करावं लागेल. यानंतर १० एमबीपेक्षा जास्त क्षमतेच्या फाईल्स ओपन होतील. तुम्ही या फाईल्स डिलिट करून साईज वाढवू शकता. युजर्स सर्च बारमध्ये दहा एमबीपेक्षा कमी किंवा जास्त क्षमतेच्या फाईल्स सर्च करून त्या डिलिट करू शकतात.

## फोन वर्ल्ड

### गुगल पिक्सेल 8 E



गुगल पिक्सेल सीरिजमध्ये आता एआयची जादू पाहायला मिळणार आहे. कंपनीने ग्राहकांसाठी गूगलच्या पिक्सेल 8 E (Google Pixel 8a) नावाचा स्मार्टफोन बाजारात आणला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून गॅझेटप्रेमींची प्रतीक्षा संपली असून, भारतात गुगलच्या पिक्सेल 8 E उपलब्ध होणार आहे. यामध्ये ऑडिओ मॅजिक इरेजर आहे, जे तुमच्या व्हिडीओमधील विविध आवाज ओळखते आणि बॅकग्राऊंडमधील आवाज कमी करते. तसेच एआय वॉलपेपर, व्हिडिओ बूस्ट, सर्कल टू सर्च, गुगलचे व्हॉईस रेकॉर्डर आदी फीचर्स या स्मार्टफोनमध्ये असणार आहेत. यामध्ये ड्युअल कॅमेरा सेटअप असेल. बॅटरी 4492mAh इतकी आहे. हा फोन ग्रीन कलरमध्ये उपलब्ध असेल आणि भारतात याची किंमत ५२,९९९ रुपये असणार आहे.

## बी अलर्ट

### सेकंड हँड आयफोन घेताय?



आयफोनच नव्हे तर कोणताही सेंकड हँड फोन घेताना सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे खरेदीचा पुरावा तपासून घेणे आहे. त्या फोनचे बिल चेक करायला हवे. फोनची वारंटी तपासण्यासाठी सर्वात आधी आयफोनच्या सेटींगमध्ये जा. सिरियल नंबर कॉपी करुन checkcoverage.apple.com वर टाकल्यावर सर्व डिटेल्स मिळतील. आयफोनची बॅटरीची हेल्थ ८० टक्क्यांपेक्षा जास्त असल्यास तो आयफोन विकत घेण्यास काहीच हरकत नाही. परंतु त्यापेक्षा कमी असल्यास विचार करुन निर्णय घ्या.

## टिप्स ॲण्ड ट्रिक्स

### बॅटरी लवकर संपते का?




काही गोष्टी लक्षात ठेवून तुमच्या फोनची बॅटरी संपण्याची समस्या दूर केली जावू शकते. बॅटरी लवकर संपत असेल तर तुम्ही Settings Battery Usage वर जाऊन. तुम्ही iOS वापरकर्ते असल्यास सेटिंग्जमध्ये बॅटरी पर्यायावर जा. बॅटरी सेव्हर मोड चालू करा तुमचा स्मार्टफोन बॅटरी-सेव्हर किंवा पॉवर-सेव्हिंग मोडसह येतो. बॅटरीचे आयुष्य वाढविण्यात मदत करण्यासाठी ही सेटिंग समाविष्ट करा. बॅटरी पातळी २० ते ८०% दरम्यान ठेवा. त्यामुळे बॅटरीचे आरोग्य चांगले राहते. तुमची बॅटरी २०% पर्यंत पोहोचल्यावरच चार्जिंग करणे. बॅटरीचे नुकसान टाळण्यासाठी ती ८०% पर्यंतच चार्ज करणे.

# कधी करायचं स्ट्रेचिंग?

कोणतेही व्यायामप्रकार करताना स्ट्रेचिंग म्हणजे शरीर ताणण्याचे व्यायाम करणं आवश्यक आहे. स्ट्रेचिंगचं महत्त्व जाणूनही अनेक जण ते टाळतात किंवा योग्य पद्धतीने करत नाहीत. स्ट्रेचिंगमुळे स्नायू लवचिक होतात. अर्थात स्ट्रेचिंगही योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने करावं लागतं. स्ट्रेचिंगच्या लाभांविषयी आपण जाणून घेऊ.

✻ आठवड्यातून एक किंवा दोन वेळा व्यायाम करणाऱ्यांनाही स्ट्रेचिंग करायला हवं. यामुळे स्नायू लवचिक होतात आणि कोणताही व्यायाम करताना हालचाल अगदी सुलभ पद्धतीने करता येते. इतकंच नाही तर स्ट्रेचिंगमुळे संभाव्य दुखापत टाळता येते.



**फिटनेस फंडा**

✻ व्यायामाआधीच्या स्टॅटिक स्ट्रेचिंगमुळे हालचालींना मर्यादा येतात, हे काही संशोधनांमधून समोर आलं आहे. पण म्हणून तुम्ही स्ट्रेचिंग सोडू नका. व्यायामाआधी स्टॅटिक स्ट्रेचिंग करण्यापेक्षा व्यायामानंतर करा.


✻ व्यायामाआधी डायनॅमिक स्ट्रेचिंग करणं योग्य ठरतं. डायनॅमिक स्ट्रेचिंग म्हणजे जलदगतीने केली जाणारी शरीराची हालचाल. त्यामुळे व्यायाम सुरू करण्याआधी एका जागी उभं राहून जॉगिंग करण्यासारखं स्ट्रेचिंग करता येईल.

✻ स्टॅटिक स्ट्रेचिंगमध्ये एका ठराविक स्थितीत काही काळा राहून स्नायूंच्या एका गटावर ताण आणला जातो. अशा स्ट्रेचिंगमुळे स्नायू मोकळे होऊ लागतात. त्यामुळे अशा पद्धतीचं स्ट्रेचिंग व्यायामानंतर करणं योग्य ठरतं. हाय नीज, वॉकिंग लंजेस हे डायनॅमिक स्ट्रेचिंगचे काही प्रकार आहेत.

# मॉन्सून ट्रेकिंग स्पॉट्स

दोस्तांनो, आता लवकरच पावसाला सुरूवात होईल. या पावसाळ्यात ट्रेकर्स मोठ्या प्रमाणावर ट्रेकिंगसाठी बाहेर पडतात. पावसाळा हा ट्रेकिंगसाठीचा सर्वोत्तम काळ मानला जातो. लवकरच मान्सूनचं आगमन होणार आहे. कोरोनाची प्रकरणं कमी होत असल्यामुळे येत्या काळात निर्बंध शिथिल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या काळात ट्रेकिंगच्या योजना आखल्या जातील. तुम्हालाही ट्रेकिंगची आवड असेल तर या ठिकाणांचा विचार करता येईल. ✻ हिमाचल प्रदेश हे पर्यटकांचं आवडतं ठिकाण. सध्या वर्केशनसाठीही अनेक जण हिमाचलला जातात. इथे ट्रेकिंगची अनेक ठिकाणं आहेत. हाम्टा पास हे असंच एक ठिकाण. नवख्या ट्रेकर्ससाठी हे सर्वोत्तम ठिकाण आहे. कुल्लू खोऱ्यातल्या हाम्टा पासपासून या ट्रेकला सुरूवात होते. हा ट्रेक स्पिती व्हॅलीपर्यंतचा ३५ किलोमीटरचा हा ट्रेक आहे. साधारण चार ते पाच दिवसात हा ट्रेक पूर्ण होतो. ✻ लोणावळ्याजवळचा राजमाची किल्ला ट्रेकर्सना भुरळ पाडतो. राजमाचीचा ट्रेक सोपा असून ट्रेकिंगची सुरूवात करायची असेल तर राजमाचीला जाता येईल. हा ट्रेक अवघ्या ४० मिनिटांमध्ये पूर्ण होतो. ✻ सिक्कीम येथील डजोंगरी हे ठिकाण ट्रेकिंगसाठी खूप प्रसिद्ध आहे. हा २१ किलोमीटरचा ट्रेक असून एक ते दोन दिवसात पूर्ण होतो. ट्रेकिंगची आवड असणारे आवर्जून सिक्किमला येतात.

**भटकंती**



हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, ✻ कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11